- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक
सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर
संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,३१,७०० /-
✔ २२ कॅरेट : १,२०,३५० /-
✔ चांदी : १,५८,३००/-

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : गुरूवार, १९ नोव्हेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३३९ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

ओबीसीसाठी ६,८४० कोटींच्या निधीची शिफारस

ओबीसी समिती अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती, ६ ते ८ जानेवारीदरम्यान राज्यभर व्हिजेएनटीसाठी शिबिरे

दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई

राज्यातील १८ पगड जाती आणि ओबीसी घटकांना न्याय देण्यासाठी विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागण्यांमध्ये विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती व वसतिगृह बांधकामासाठी तब्बल ६,८४० कोटी रुपयांच्या निधीची शिफारस करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महसूलमंत्री तथा ओबीसी मंत्रिमंडळ उपसमिती अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत घेण्यात आला.

ओबीसी समाजाच्या प्रलंबित प्रश्नांना गती देण्यासाठी आणि कल्याणकारी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महसूलमंत्री तथा ओबीसी मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली आज (दि. १८) रोजी मंत्रालयात बैठक पार पडली. अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे आणि ओबीसी कल्याण मंत्री अतुल सावे दुरदृश्यप्रमालीद्वारे उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार ओबीसी समाजाचे हक्क मिळवून देण्यासाठी उपसमिती सातत्याने काम करत असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. केंद्र शासनाच्या एनएसपी पोर्टलवर विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती प्रक्रियेसाठी १,८०० कोटी रुपये अपेक्षित असताना सध्या केवळ ८३ कोटींची तरतूद असल्याने हा निधी तात्काळ वाढवून देण्याची आवश्यकता बैठकीत अधोरेखित करण्यात आली. तसेच 'महाज्योती'साठी ७०० कोटी रुपयांचा निधीसह पुणे येथील प्रस्तावित



संकुलासाठी जागा देणे आणि अनुशेष भरून काढण्याबाबतही सविस्तर चर्चा झाली.

विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि भटक्या समाजातील ४३ जातींना हक्काची ओळख आणि निवारा मिळवून देण्यासाठी शासनाने मोठे पाऊल उचलले आहे. येत्या ६, ७ आणि ८ जानेवारी २०२७ रोजी राज्यभरात सुमारे ५०० विशेष शिबिरे आयोजित करून या घटकांना १०० टक्के जन्माचे दाखले आणि आधार कार्ड मिळवून दिले जाणार आहेत. या मोहिमेसाठी प्रत्येक सर्कलला १० हजार रुपये दिले जातील, तसेच ओबीसींच्या विविध योजनांमार्फत बांधण्यात आलेल्या घरकुलांवर दोन मोहिन्यांच्या आत लाभार्थ्यांच्या नावाचे फलक लावण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

वसतिगृह उभारणीच्या कामात सुसूत्रता आणताना प्रत्येक जिल्ह्यात १०० आणि विभागीय जिल्ह्यांत २५० मुला-मुलींची वसतिगृहे बांधण्याचा निर्णय घेण्यात आला असून, याबाबत एमएसआयडीसीने तयार केलेल्या आराखड्यानुसार मार्चपासून प्रत्यक्ष बांधकाम सुरू होणार आहे. सर्व वसतिगृहे पर्यावरणपूरक आणि सौरऊर्जेचा वापर करून बांधावीत तसेच ३० डिसेंबरपर्यंत सर्व प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करून मार्चच्या अर्थसंकल्पात १० नवीन वसतिगृहांसाठी तरतूद करावी, अशा सूचना मंत्री पंकजा मुंडे यांनी दिल्या.

गोरेगाव येथील दुग्धव्यवसाय विकास विभागाच्या न्यूझीलंड वसतिगृहात इतर मागास बहुजन कल्याण विभागाला ८० खोल्या देण्याबाबत पत्रव्यवहार करण्यात आला आहे. याशिवाय, पुण्यातील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर 'ए-कॅप'ची नस्ती अंतिम मान्यतेसाठी मुख्यमंत्र्यांकडे पाठवण्यात आली असून लक्ष्मण हाके यांच्या मागण्याही पूर्ण केल्याचे बावनकुळे यांनी स्पष्ट केले. महात्मा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त विविध उपक्रम राबवण्यासोबतच ९ टक्के आरक्षणाचा नव्याने अभ्यास करून सांख्यिकी विभागाकडे प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मंत्री छगन भुजबळ यांनी दिले.

महायुतीतील नेत्यांवरील टीका सहन करणार नाही

महायुतीच्या समन्वय समितीच्या बैठकीत तिन्ही घटक पक्षांनी एकमताने निर्णय घेतला असून यापुढे आमदार, खासदार किंवा पदाधिकाऱ्यांनी मित्रपक्षांच्या नेत्यांवर जाहीर टीका करू नये. असे सांगण्यात आले आहे. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे किंवा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यावर विरोधकांकडून किंवा सोशल मीडियावर खालच्या पातळीवर टीका झाल्यास तिन्ही पक्ष एकत्रितपणे मैदानात उतरून सडेतोड प्रत्युत्तर देतील. असे बावनकुळे यांनी बैठकीनंतर पत्रकारांना सांगितले.

रोहित पवारांनी माफी मागावी

मुख्यमंत्र्यांवर केलेल्या टीकेबाबत सुप्रिया सुळे यांनी ते रोहित पवारांचे व्यक्तिगत मत असल्याचे स्पष्ट केले असले, तरी शरद पवार यांनी दिलेले संस्कार रोहित पवारांनी पाळावेत. विकासाच्या राजकारणात मिठाचा खडा टाकण्याचे काम करू नये आणि त्यांनी देवेंद्र फडणवीस यांची माफी मागावी, असे यावेळी बावनकुळे म्हणाले.

महिलांचा अवमान करणाऱ्या विधानांचा निषेध

शायना एनसी यांच्याकडून अनावधानाने घडलेल्या घटनेचे राजकारण करत संजय राऊत यांनी वापरलेल्या आक्षेपार्ह भाषेचा बावनकुळे यांनी तीव्र शब्दांत निषेध केला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात महिलांबद्दल अशी भाषा वापरून राज्याची संस्कृती कलंकित केली जात असल्याचे ते म्हणाले.

सातारा जिल्हा बँक व स्थानिक राजकारण

भाजपला बाजूला सारत सातारा जिल्हा बँकेत राष्ट्रवादी आणि शिवसेनेने बँकेच्या अध्यक्षपदी उदयसिंह पाटील यांना संधी दिली. याबाबत पत्रकारांनी विचारले असता सातारा जिल्हा परिषद निवडणुकीपासून स्थानिक नेत्यांमध्ये निर्माण झालेले मतभेद दूर करण्यासाठी लवकरच महायुतीचे सर्व प्रमुख नेते एकत्र बसून समन्वय साधतील आणि जिल्ह्यात एकोपा कायम राखतील, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

थोडक्यात

सोने-चांदीचे दर कोसळले

नवी दिल्ली/मुंबई : सोने चांदी खरेदी करण्याचा विचार करणा-यांसाठी मोठी बातमी आहे. गेल्या काही दिवसांपासून सोने आणि चांदीच्या दरात मोठी घसरण पाहायला मिळत आहे. बुधवारी देशांतर्गत वायदे बाजारात सोन्याचा भाव एका दिवसात तब्बल ३,२०० रुपयांनी घसरला. तर चांदीच्या दरातही मोठी घट झाली. चांदीचा भाव एका दिवसात जवळपास ५,९०० रुपयांनी कमी झाला. त्यामुळे बाजारात खळबळ उडाली आहे. या घसरणीमागे अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्ह बँकेच्या व्याजदारांबाबतच्या भूमिकेचा परिणाम असल्याचे सांगितले जात आहे. डिसेंबरमधील बैठकीत अमेरिकेची मध्यवर्ती बँक व्याजदर वाढवू शकते, अशी शक्यता काही अहवालांमध्ये व्यक्त करण्यात आली आहे. भविष्यातही व्याजदर वाढण्याची शक्यता असल्याने गुंतवणूकदारांनी सोने आणि चांदीमधील गुंतवणूक कमी करण्यास सुरुवात केली आहे. चांदीच्या दरातही मोठी घट झाली आहे. चांदीचा भाव किलोमागे ४,४०० रुपयांनी घसरून १,६४,५०६ रुपयांवर आला आहे. दिल्लीपासून मुंबईपर्यंत देशातील अनेक सराफा बाजारांमध्ये या घसरणीचा परिणाम दिसून येत आहे.सोने आणि चांदीच्या दरात झालेली घसरण किती मोठी आहे, हे त्यांच्या विक्रमी किमतींवरून लक्षात येते. जानेवारी महिन्यात सोन्याचा भाव १.९३ लाख रुपये प्रति १० ग्रॅम या विक्रमी पातळीवर पोहोचला होता. मात्र, आता तो घसरून जवळपास १.३१ लाख रुपयांवर आला आहे. म्हणजेच सोन्याच्या दरात आतापर्यंत जवळपास ६४ हजार रुपयांची घसरण झाली आहे.

चंद्रपूरच्या प्रियदर्शनी इंदिरा चौकात पुरुषाचे कापलेले शीर

रेल्वे उड्डाणपुलाखाली धड आढळल्याने शहरात खळबळ

दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर :-(धनंजय पांढरे)

शहराच्या मध्यवर्ती आणि अतिव्यस्त प्रियदर्शनी इंदिरा चौक परिसरात पुरुषाचे कापलेले शीर आढळून आल्याने संपूर्ण चंद्रपूर शहरात खळबळ उडाली आहे. शहरातील गजबजलेल्या भागात मानवी शरीराचे अवयव वेगवेगळ्या ठिकाणी आढळल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, या घटनेचे गांभीर्य वाढले आहे.

प्राथमिक माहितीनुसार, प्रियदर्शनी इंदिरा चौक परिसरात एका पुरुषाचे कापलेले शीर आढळून आले, तर रेल्वे उड्डाणपुलाखाली जाहिरातींच्या फलकाजवळ त्याचे धड आढळल्याची माहिती समोर आली आहे. एकाच व्यक्तीच्या शरीराचे अवयव वेगवेगळ्या ठिकाणी आढळल्याने हा प्रकार अत्यंत गंभीर आणि संशयास्पद मानला जात आहे.

घटनेची माहिती पोलिसांना मिळताच रामनगर पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिसराची पाहणी करून तपासाला सुरुवात केली. दरम्यान, श्वान पथकाला घटनास्थळी पाचारण करण्यात आले. कापलेले शीर श्वान पथकाला सुगावा घेण्यासाठी देण्यात आल्यानंतर श्वानाने रेल्वे उड्डाणपुलाच्या दिशेने मार्गक्रमण केल्याची माहिती आहे. त्यामुळे या प्रकरणाचा तपासाला महत्त्वपूर्ण दिशा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.मृत व्यक्तीची ओळख अद्याप स्पष्ट झालेली नसून, हा प्रकार नेमका कसा घडला, मृतदेहाचे अवयव वेगवेगळ्या ठिकाणी कोणी आणि कोणत्या उद्देशाने टाकले, याबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. हत्या करून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेहाची विल्हेवाट लावण्यात आली आहे का, याचाही तपास पोलीस करीत आहेत. चंद्रपूरच्या मध्यवर्ती आणि वर्दळीच्या परिसरात घडलेल्या या अमानुष व थरारक घटनेने शहर हादरले आहे. पोलीस तपासातून मृत व्यक्तीची ओळख आणि या घटनेमागील नेमके सत्य काय समोर येते, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

महाज्योतीचे कामकाज नियमांच्या चौकटीत!

शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार कामकाज, प्रशिक्षण योजनांसाठी संस्था प्रयत्नशील

दै.सिंहवाणी वृत्त, नागपूर

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) ही राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत कार्यरत संस्था असून, विविध प्रशिक्षण योजनांची अंमलबजावणी शासनाचे नियम, मार्गदर्शक तत्त्वे आणि निर्धारित प्रशासकीय प्रक्रियेनुसार केली जाते. संस्थेच्या कामकाजात पारदर्शकता राखण्यासोबतच विद्यार्थ्यांना दर्जेदार प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात आहे.

महाज्योतीच्या निधीचा विनियोग आणि प्रशिक्षण योजनांच्या अंमलबजावणीबाबत अलीकडे उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर संस्थेची कार्यपद्धती आणि प्रशिक्षण कार्यक्रमांची सद्यस्थिती महत्त्वाची ठरते. विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा परीक्षा, व्यावसायिक अभ्यासक्रम आणि कौशल्य विकासविषयक प्रशिक्षण योजना राबविताना आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करणे गरजेचे असते. त्यानुसार संस्थेचे कामकाज सुरू असल्याची भूमिका व्यवस्थापनाने मांडली आहे. राज्यातील विविध सामाजिक प्रवर्गांतील विद्यार्थ्यांसाठी बार्टी, सारथी, टीआरटीआय, वनार्टी आणि अमृत या संस्था प्रशिक्षण कार्यक्रम राबवितात. या संस्थांच्या प्रशिक्षण कार्यक्रमांसोबतच महाज्योतीचे प्रशिक्षणही सुरू करण्यात येणार आहे. प्रशिक्षण योजनांच्या अंमलबजावणीसाठी शासनाच्या निर्धारित नियमांचे पालन करून विद्यार्थ्यांच्या हिताला प्राधान्य दिले जात असल्याचे संस्थेने स्पष्ट केले आहे. संस्थेच्या कामकाजासंदर्भात कोणताही निष्कर्ष काढण्यापूर्वी वस्तुस्थितीची खातरजमा करणे आवश्यक असल्याची भूमिकाही व्यवस्थापनाने मांडली आहे.

महाज्योती
– ज्ञानदीप समतेचा –

आरोप निराधार, कामकाज पारदर्शक

महाज्योतीवर करण्यात आलेले आरोप पूर्णपणे निराधार आणि वस्तुस्थितीला धरून नाहीत. संस्थेचे कामकाज शासनाच्या नियम व मार्गदर्शक तत्त्वांनुसार पारदर्शकपणे सुरू आहे. विद्यार्थ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देऊन विविध प्रशिक्षण योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील आहे. बार्टी, सारथी, टीआरटीआय, वनार्टी आणि अमृत या सर्व संस्थांच्या प्रशिक्षणांसोबतच 'महाज्योती'चे प्रशिक्षणही सुरू करण्याचा येणार आहे. वस्तुस्थितीची खातरजमा केल्याशिवाय अशा प्रकारचे आरोप करणे योग्य नाही.

– मिलिंद नारिंगे, व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था, नागपूर (महाज्योती)

ब्रह्मपुरीत विनापरवाना वजनकाट्यांचा व्यवसाय सुरू असल्याचा आरोप!

पूर्वी पोलीस गुन्हा व न्यायालयीन खटला दाखल होऊनही पुन्हा व्यवसाय सुरू? S. A. Services, S.A.I. WEIGHING आणि Sai Electronic Scale प्रकरणी परवाने निलंबित आणि फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी


दै. सिंहवाणी वृत्त, ब्रह्मपुरी (चंद्रपूर)

वैधमापन शास्त्र विभागाच्या नियमांना हरताळ फासून विनापरवाना वजनकाट्यांची विक्री, विनापडताळणी व विनामुद्रांकन वजनमाप उपकरणांचा बाजारपेठेत पुरवठा, दुसऱ्यांच्या ब्रँडचा कथित गैरवापर आणि बनावट बिल बुकच्या माध्यमातून ग्राहकांची फसवणूक होत असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे.

ब्रह्मपुरी येथील S. A. Services, S.A.I. WEIGHING SERVICES चे प्रोप्रायटर आशिष मधुकर पारधी आणि वडसा येथील Sai Electronic Scale चे प्रोप्रायटर सूरज मधुकर पारधी, दोघेही राहणार उदापूर, तालुका ब्रह्मपुरी, जिल्हा चंद्रपूर, यांच्याविरोधात या संदर्भात कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

सहा महिन्यांपूर्वी पोलीस गुन्हा; न्यायालयातही प्रकरण

संबंधित दोघांविरुद्ध सुमारे सहा महिन्यांपूर्वी ब्रह्मपुरी पोलीस स्टेशन येथे कथित बनावट वजनमाप उपकरणे, दुसऱ्यांच्या ब्रँडचा वापर, बनावट बिल बुक आणि ग्राहकांची फसवणूक यासंदर्भात गुन्हा दाखल करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. तसेच वैधमापन शास्त्र विभागानेही त्यांच्याविरुद्ध कारवाई करून



न्यायालयात खटला दाखल केल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र, वापूर्वी कारवाई होऊनही संबंधितांकडून पुन्हा बेकायदेशीर व्यवसाय सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

लोकरे निवास येथे मोठा फलक; विक्रेता परवाना नसल्याचा आरोप

ब्रह्मपुरी येथील लोकरे निवास, पहिला मजला येथे S. A. Services या नावाने मोठा फलक लावून वजनकाट्यांची विक्री सुरू असल्याचे प्रत्यक्ष पाहणीत आढळल्याचे तक्रारदाराचे म्हणणे आहे.

विशेष म्हणजे, या व्यवसायासाठी आवश्यक वैध विक्रेता परवाना संबंधितांकडे नसल्याचे पुरावे उपलब्ध असल्याचा दावा तक्रारदाराने केला आहे. शासन व संबंधित विभागाला या बाबीची माहिती असूनही व्यवसाय सुरू असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. विविध कथित ब्रँडचे वजनकाटे विनापडताळणी व विनामुद्रांकन बाजारपेठेत विकले जात असल्याचेही तक्रारीत म्हटले आहे.

विक्रेत्यांबरोबर पुरवठादार उत्पादकांवरही कारवाईची मागणी!

या प्रकरणात केवळ विक्रेत्यांवर कारवाई करून चालणार नाही, तर अशा प्रकारचे नियमबाह्य वजनकाटे पुरविणाऱ्या उत्पादक, वितरक आणि पुरवठादारांचीही सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. वजनमाप उपकरणांच्या अचूकतेशी थेट संबंध असल्याने अशा प्रकारांमुळे शेतकरी, व्यापारी आणि सर्वसामान्य ग्राहकांची आर्थिक फसवणूक होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

पुरावे उपलब्ध; चौकशीदरम्यान शासनाकडे सादर करणार

या संपूर्ण प्रकरणासंदर्भात छायाचित्रे, दस्तऐवज, व्यवसायस्थळावरील पुरावे, कथित विनापरवाना व्यवसायासंबंधी माहिती तसेच वजनकाट्यांच्या संदर्भातील महत्त्वपूर्ण पुरावे उपलब्ध असल्याचा दावा तक्रारदाराने केला आहे.

मात्र, पुराव्यांमध्ये छेडछाड होऊ नये, संबंधितांकडून पुरावे नष्ट केले जाऊ नयेत आणि निष्पक्ष चौकशीला बाधा येऊ नये, या उद्देशाने सर्व पुरावे तक्रारीसोबत सार्वजनिक न करता अधिकृत चौकशीदरम्यान सक्षम शासकीय अधिकाऱ्यांकडे स्वतः सादर करण्यात येणार असल्याचे तक्रारदाराने स्पष्ट केले आहे.

परवाने तातडीने निलंबित करण्याची ठाम मागणी

मा. उपनियंत्रक, वैधमापन शास्त्र विभाग, चंद्रपूर व गडचिरोली आणि सहनियंत्रक नागपूर यांच्याकडे सादर करण्यात येणाऱ्या तक्रारीत संबंधित व्यवसायांची तातडीने तपासणी करावी, बेकायदेशीर वजनकाट्यांचा साठा जप्त करावा, संबंधितांकडे कोणतेही विक्रेता परवाने असल्यास त्यांचे तातडीने निलंबन करून रद्द करण्याची कार्यवाही करावी, तसेच विनापरवाना व्यवसाय त्वरित बंद करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय संबंधित उत्पादक व पुरवठादारांवरही कायद्यानुसार कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या तक्रारीची प्रत मा. सहनियंत्रक, वैधमापन शास्त्र विभाग, नागपूर विभाग आणि मा. नियंत्रक, वैधमापन शास्त्र विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनाही पाठविण्यात आली आहे. आता या गंभीर तक्रारीवर वैधमापन शास्त्र विभाग कोणती भूमिका घेतो, संबंधितांच्या व्यवसायाची प्रत्यक्ष तपासणी कधी करतो आणि परवाना निलंबनासह कठोर कारवाईचे आदेश कधी देतो, याकडे चंद्रपूर जिल्ह्यातील वजनमाप व्यवसाय क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

दैनिक सिंहवाणी वृत्त Epaper : epaper.sinhvani.com दिनांक : गुरूवार, १९ नोव्हेंबर २०२६

संपादकीय लेखणीतून...

एसआयआर विरोधात धाव

देशभरातील मतदार याद्यांच्या विशेष सखोल तपासणीच्या (एसआयआर) निर्णय प्रक्रियेवरून विरोधी पक्ष आणि निवडणूक आयोग यांच्यातील वाद दिवसेंदिवस अधिकच तीव्र होत चालला आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सुरुवातीपासूनच याबाबत आक्रमक भूमिका घेतली असून सोमवारी सर्वोच्च न्यायालयात धाव घेत निवडणूक आयोगाला ४८ लेखी प्रश्न विचारण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी करणारी याचिका दाखल केली आहे. इतकेच नव्हे, तर मुख्य निवडणूक आयुक्त आणि अन्य निवडणूक आयुक्तांनी त्याची प्रतिज्ञापत्राद्वारे उत्तरे द्यावीत, अशी मागणीही राहुल गांधी यांनी केली आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रातील दाव्यांची पडताळणी करण्यासाठी मुख्य निवडणूक आयुक्तांसह अन्य दोन निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी, तसेच उपनिवडणूक आयुक्त यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांना ४८ प्रश्न विचारण्याची संधी द्यावी, अशी मागणी इंडिया आघाडीच्या वतीने करण्यात आली आहे.एसआयआर प्रक्रियेत अधिकृत मान्यता देण्याची पद्धत, मतदारांची कथित वगळणी आणि आयोगाच्या ऑनलाईन मतदार नोंदणी प्रणालीमध्ये करण्यात आलेले बदल या मुद्यांवर स्पष्टीकरण मागण्यात आले आहे. देशव्यापी विशेष सखोल तपासणीचा निर्णय निवडणूक आयोगाने सामूहिकरीत्या घेतला होता की, अन्य निवडणूक आयुक्तांना माहिती न देता, त्यांची मान्यता किंवा सहमती न घेता मुख्य निवडणूक आयुक्तांनी आयोगाचे अधिकार वापरले, असा सवाल याचिकेत उपस्थित करण्यात आला आहे. सध्याचा अर्ज मंजूर करून याचिकाकर्त्यांना प्रतिवादींकडे संबंधित प्रश्नावली पाठवण्याची परवानगी द्यावी तसेच प्रश्नांमध्ये नमूद केलेल्या संबंधित व्यक्तींनी प्रतिज्ञापत्राद्वारे उत्तरे द्यावीत. उत्तरांमध्ये उल्लेख केलेल्या कागदपत्रांच्या प्रती जोडण्यात याव्यात.

कोणत्याही कागदपत्राबाबत गोपनीयतेचा किंवा विशेषाधिकाराचा दावा असल्यास, त्याची कारणे प्रत्येक कागदपत्रासाठी स्वतंत्रपणे नमूद करावीत, जेणेकरून न्यायालयाला त्यावर निर्णय घेता येईल. न्यायालयाच्या परवानगीने एका पक्षकाराने दुसऱ्या पक्षकाराला माहिती मिळवण्यासाठी लेखी स्वरूपात विचारलेल्या प्रश्नांना इंटरोगेटरीज (प्रश्नावली) असे म्हणतात. मुख्य निवडणूक आयुक्त आणि आयोगाच्या निर्णयाविरोधात दाखल याचिकांवर निवडणूक आयोगाने २४८ पानांचे उत्तर सादर करून एसआयआर प्रक्रियेचे समर्थन केले आहे. अर्ज क्रमांक ६ मध्ये कोणताही बदल करण्यात आल्याचा आरोप फेटाळताना, मतदार नोंदणीसाठी वापरण्यात येणाऱ्या वैधानिक अर्जामध्ये कोणताही बदल केला नसल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे. पात्र व्यक्तीला मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी अर्ज क्रमांक ६ भरावा लागतो, असे आयोगाने म्हटले आहे. निवडणूक आयोगावर आरोप करण्याचा प्रयत्न दुर्दैवी आहे, असे आयोगाच्या वतीने उपनिवडणूक आयुक्त भानू प्रकाश येतुरू यांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे.

देशव्यापी एसआयआर प्रक्रियेला अधिकृत मान्यता देणारा आयोगाचा कोणताही नोंदवलेला निर्णय उपलब्ध नसणे, ऑनलाईन अर्ज क्र. ६ मध्ये करण्यात आलेले बदल तसेच ईसीआयनेट आणि ईआरओनेट या मतदार यादींच्या डेटाबेसची कार्यपद्धती यावरही याचिकाकर्त्यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. या प्रणाली केंद्रीकृत आणि पारदर्शकतेचा अभाव असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. एसआयआरच्या निर्णय प्रक्रियेबाबत निवडणूक आयोग, मुख्य निवडणूक आयुक्त आणि संबंधित अधिकाऱ्यांना विचारण्यासाठी याचिकेत ४८ प्रश्नांची यादी देण्यात आली आहे. आयोगाच्या ऑनलाईन पोर्टलमध्ये करण्यात आलेल्या सुधारणा आणि बदलांची माहिती तसेच हे बदल करण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तींची नावेही उघड करण्याची मागणी करण्यात आली आहे. ऑनलाईन अर्ज क्र. ६ मध्ये घोषणापत्राचा समावेश करण्यात आल्याची बाब निवडणूक आयोगाने मान्य केल्याचा संदर्भ याचिकेत देण्यात आला आहे. मात्र, हे बदल करण्यास कोणत्या व्यक्तीने परवानगी दिली, याची माहिती आयोगाच्या उत्तरात देण्यात आलेली नाही, असे याचिकाकर्त्यांनी म्हटले आहे.

सह्याद्री वाचला पाहिजे !

लीलाधर दवंडे कामठी(नागपूर)

एकीकडे रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात प्रस्तावित अदानी समूहाच्या टोरांटो पॉवर प्लांटला राज्यात सर्व स्तरांतून होणारा विरोध अधिकच वाढत असतांना दुसरीकडे याकडे कानाडोळा करत टोरांटो कंपनीने नुकतेच चिपळूण परिसरातील सह्याद्रीच्या रांगेत वृक्षारोपणासाठी सर्वेक्षण केल्याचे वृत्त वाचनात आले. या प्रकल्पाला अभिनेते सयाजी शिंदेसह आदिवासी बांधव आणि राज्यातील तरुण वर्गातून मोठा विरोध होतो आहे. पर्यावरणप्रेमी जागोजागी या विरोधात प्रदर्शने आणि धरणे करत असले तरी महाराष्ट्र सरकार हा प्रकल्प राज्याच्या हिताने किती महत्त्वाचा आहे, हे पटवून सांगण्यात कुठेही कसर सोडत नाही.

ज्या सह्याद्रीने महाराष्ट्र वाचवला आहे. ज्या सह्याद्रीने शिवरायांच्या स्मृती जपल्या आहेत. त्या सह्याद्रीला बोडके भाषा वापरणारे सर्वच सरकार आपल्या व्होट बँकेसाठी पराऱ्याची लोकांना मुक्तहस्ते रोजगार वाटप करत गेले आणि स्थानिक बेरोजगार झाले. तरीसुद्धा पुन्हा पुन्हा महाराष्ट्राला वाळवंट करण्याचे पाप विद्यमान सरकार करत असेल तर सर्व स्तरांतून होणारा विरोध योग्यच आहे, असे म्हणायला हरकत नाही.

पावसाळा कधीचाच संपून गेला असतांना टोरांटो कंपनीने सह्याद्रीत सहाशे एकर जागेत वृक्षारोपण करण्यासाठी सर्वे सुरू केलेला आहे. दुसरीकडे कंपनीचे काम सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे सह्याद्रीच्या कुशीतील तब्बल सहाशे एकर मधील वृक्षतोड ठरलेली आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड झाली तर त्यातील जैवविविधतेला हानी पोहचणार नाही काय? या वनराजीवर अवलंबून असलेली पाखरे, श्वापदे कुठे जातील? कंपनी आता वृक्षारोपण करते आहे. या वृक्षांना मोठे होण्यास आणि तिथे जंगल निर्माण होण्यास दशक भराहून अधिक काळ लागेल. त्यातही लावल्या झाडांपैकी किती जगतील आणि किती नाही, याची शाश्वती नाही. तोपर्यंत या जंगलातील या पशू पक्ष्यांना कंपनीच्या मालकाच्या घरात सांभाळून ठेवायचे काय? लहान लहान जीव, त्यांची पिले.. अंडी सारीच नष्ट झाल्यावर हा प्रकल्प सजीवांच्या हिताचा आहे असे कसे म्हणू शकता? जर कंपनीला येथे प्रकल्पच राबवायचा होता. तर, निदान दशक भराआधी अन्यत्र वृक्षारोपण करून जंगल निर्माण करायला हवं होतं. आता सहाशे एकरमधील वृक्षतोड केल्यानंतर पर्यावरणाला हानी पोहचत नाही, असा दावा कंपनी किंवा राज्य सरकार करत असेल तर काय म्हणावे? त्यांच्या बुद्धीची कीव करावी तितकी थोडीच म्हणावी. शासकीय आकडेवारी नुसार तब्बल ४० हजार झाडांची येथे कत्तल होणार आहे. प्रति झाड एक घरटे पकडले तरी चाळीस हजार पाखरांची वस्ती नेस्तनाबूत करण्याचे पाप राज्य सरकारच्या मानगुटीवर बसले तर उद्या सरकारचा नायनाट व्हायला वेळ लागणार नाही. राज्यात अगदी जानेवारी पासून उन्हाचे तडाके लागायला सुरुवात होत आहे. पिण्याच्या पाण्याची वानवा असतांना शेतीची कामे खोळंबली जाऊ लागली आहेत अन् सरकार विकासाच्या नावाखाली शेकडो एकर जंगलाचा बळी देण्यात धन्यता मानत असेल तर असा विकास कुठल्या कामाचा? प्रकल्प, कंपन्या उभारण्यासाठी सदाबहार वनराजी वगळता राज्यात अन्यत्र पडीक जमीन नाही काय? जर तिथे जागा व्यवस्थित नसेल तर, जो खर्च सह्याद्री ओसाड करतांना केला जात आहे, तोच खर्च पडीक जमिनीवर करून तिथे प्रकल्प उभारायला कुणाची हरकत आहे काय? उगाच सह्याद्रीला बोडके करण्याचा अट्टाहास करून सरकारने राजकीय लाभासाठी राज्य किंवा देश कुणा एका व्यक्तीच्या दावणीला बांधू नये आणि सदाहरित वृक्षसंपदा तोडून स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारून घेऊ नये. सह्याद्रीच नाही तर राज्य सरकारची कुदृष्टी विदभार्तील झाडी पट्टीवर सुद्धा झाली आहे. दरवर्षी सरकार कोटी वृक्ष लावण्याचा मानस जाहीर करतात आणि हा संकल्प कधीच पूर्ण होत नाही.

यंदातर पावसाळा संपल्यावर कित्येक ग्रामपंचायतींना वृक्ष वाटण्यात आले. रस्त्याच्या कडेला लावलेले वृक्ष कधीच मरून पडली असल्याचे चित्र आहे, याकडे सर्वांचे दुर्लक्ष आहे. सरकारी तिजोरीतील संपत्तीची अशीच उधळण दरवर्षी केल्या जाते, ही फार विचार करण्यालायक बाब आहे. हजारो वर्षांचा वारसा जपणारा सह्याद्री अबाधित रहावा, राज्यातील उरले सुरले जंगल कायम राहावे, इतकीच एक पर्यावरणप्रेमी म्हणून आग्रहाची विनंती.

– ८४१२८७७२२०

संस्कृतीच्या रंगात रंगलेली भारताची जागतिक मुत्सद्देगिरी

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल वर्धा

आंतरराष्ट्रीय राजकारणात आणि जागतिक मुत्सद्देगिरीत केवळ संरक्षण करार, आर्थिक उलाढाली आणि धोरणात्मक चर्चाच महत्त्वाच्या नसतात, तर परस्परांमधील सांस्कृतिक आणि भावनिक ऋणानुबंधही तितकेच मोलाचे मानले जातात. भारताच्या परराष्ट्र धोरणात अलिककडच्या काळात या 'सॉफ्ट पॉवर'चा अतिशय प्रभावीपणे वापर होताना दिसत आहे. शस्त्रास्त्रे किंवा केवळ आर्थिक बळावर अवलंबून न राहता संस्कृती, कला आणि विचारांच्या माध्यमातून इतर देशांशी संबंध दृढ करण्यावर भारताने जाणीवपूर्वक भर दिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ताज्या फिलीपींस दौऱ्यात याच धोरणाचा आणि सांस्कृतिक मुत्सद्देगिरीचा एक अत्यंत उत्कृष्ट नमुना जगाला पाहायला मिळाला. २३ व्या आसियान-भारत शिखर परिषद आणि २१ व्या पूर्व आशिया शिखर परिषदेच्या निमित्ताने मनिला येथे उपस्थित असलेल्या पंतप्रधानांनी आपल्या विशेष अंदाजाने जागतिक पातळीवर सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

मनिला येथील फिलीपींस इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटरमध्ये ४९ व्या आसियान परिषदेसाठी आलेल्या ऑटो-रिक्षाचा वापर केला, ज्या अनोख्या दृश्याने या दौऱ्यात आणखी एक रंगतदार भर घातली.

या दौऱ्यात केवळ वेशभूषेतूनच नव्हे, तर ऐतिहासिक दुव्यांतूनही मुत्सद्देगिरी पाहायला मिळाली. स्नेहभोजनाच्या आधी पंतप्रधानांनी इलिगन शहरातील इंटिग्रेटेड परफॉर्मिंग आर्ट्स गिल्ड या संस्थेने सादर केलेला 'सीताः द रामायण रिव्हिजिटेड' हा रामायणावरील विशेष नाट्यप्रयोग पाहिला. यासोबतच मनिलातील श्री सत्य साई शाळेच्या स्थानिक फिलीपिनो आणि भारतीय वंशाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले पूर्ण कुंभ श्लोक पठणही त्यांनी अत्यंत तन्मयतेने ऐकले. या सादरीकरणातून भारताचे प्राचीन महाकाव्य रामायण आणि भारतीय मूल्ये आग्नेय आशियाच्या संस्कृतीत किती खोलवर रुजलेली आहेत, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले. आमचे राजकीय आणि आर्थिक संबंध आजच्या काळातील असले, तरी आपली सांस्कृतिक पाळेमुळे शेकडो वर्षे जुनी आहेत, हा अत्यंत गहिरा संदेश यातून प्रस्थापित झाला.

या संपूर्ण दौऱ्यादरम्यान पंतप्रधान मोदींनी भारतीय वंशाच्या नागरिकांशीही अत्यंत आपुलकीने संवाद साधला. मनिला विमानतळावर आणि दौऱ्यातील इतर ठिकाणी अनिवासी भारतीयांनी त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. यावेळी त्यांनी उपस्थित नागरिकांना तुम्ही अयोध्येला भेट दिली आहे का, अशी विचारणा करत मनमोकळा संवाद साधला. परदेशात राहणाऱ्या भारतीयांनीही देशाच्या वाढत्या प्रतिष्ठेबाबत आनंद व्यक्त करत आपल्या मातृभूमीशी असलेली नाळ घट्ट असल्याचे दाखवून दिले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फिलीपींस दौरा हा केवळ राजनैतिक औपचारिकता पूर्ण करणारा दौरा नसून, सांस्कृतिक मुत्सद्देगिरीच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय संबंधांना नवी दिशा देणारा महत्त्वपूर्ण प्रयत्न म्हणून पाहता येतो. फिलीपींसचा पारंपरिक 'बारोंग तागालोग' पोशाख परिधान करून त्यांनी यजमान देशाच्या संस्कृतीप्रती आदर व्यक्त केला, तर रामायणाच्या नाट्यप्रयोगाला उपस्थित राहून भारत आणि आग्नेय आशियातील शतकानुशतकांच्या सांस्कृतिक संबंधांची आठवण करून दिली. यातून संस्कृती ही देशांना जोडणारी आणि परस्पर विश्वास दृढ करणारी प्रभावी शक्ती असल्याचे अधोरेखित झाले. आजच्या जागतिक राजकारणात केवळ आर्थिक सामर्थ्य, लष्करी क्षमता आणि व्यापारी करार यांच्या आधारावर राष्ट्रांचे संबंध टिकत नाहीत, तर परस्परांचा इतिहास, परंपरा, भावना आणि सांस्कृतिक अस्मिता यांचाही त्यात मोठा वाटा असतो.

भारताने आपल्या प्राचीन सांस्कृतिक वारशाचा उपयोग आधुनिक परराष्ट्र धोरणात अत्यंत कुशलतेने केला आहे. त्यामुळे भारत-फिलीपींस संबंधांना केवळ राजकीय आणि आर्थिक सहकार्यापुरते मर्यादित न ठेवता लोकसंपर्क, सांस्कृतिक देवाणघेवाण, व्यापार आणि इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील सामरिक सहकार्याच्या व्यापक पातळीवर नेण्याची संधी निर्माण झाली आहे. खऱ्या अर्थाने, संस्कृतीच्या माध्यमातून मैत्रीचे बंध अधिक घट्ट करणे, हाच या दौऱ्याचा सर्वात महत्त्वपूर्ण संदेश आहे.

सांस्कृतिक देवाणघेवाण आणि लोकसंपर्क या पलीकडे या दौऱ्याला एक अत्यंत भक्कम अशी राजकीय आणि धोरणात्मक किनार आहे. भारत आणि आसियान देशांमधील धोरणात्मक भागीदारी अधिक मजबूत करणे, हे या दौऱ्याचे मुख्य उद्दिष्ट आहे. यात व्यापार, कनेक्टिव्हिटी, तंत्रज्ञान आणि विशेषतः इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील सागरी सुरक्षा या विषयांवर महत्त्वाच्या चर्चा होत आहेत. २०२६ हे वर्ष आसियान-भारत सागरी सहकार्य वर्ष म्हणून साजरे केले जात असल्याच्या पार्श्वभूमीवर या परिषदेचे महत्त्व आणखीनच वाढले आहे. थोडक्यात सांगायचे तर, बंद दाराआडच्या फाईल्स आणि करारांपलीकडे जाऊन, पारंपरिक पोशाख आणि सांस्कृतिक आदरातून भौगोलिक अंतर मिटवता येते, हे भारताने जगाला दाखवून दिले आहे.

या दौऱ्याने भारताची प्रतिमा एक लवचिक, सर्वसमावेशक आणि मैत्रीपूर्ण राष्ट्र म्हणून जागतिक मंचावर अधिक भक्कम केली आहे. जग जिंकण्यासाठी नेहमीच शस्त्रांची किंवा आर्थिक सामर्थ्याची गरज नसते; कधी कधी एखाद्या देशाचा पारंपरिक पोशाख परिधान करणे, त्याच्या संस्कृतीचा सन्मान करणे आणि सामायिक ऐतिहासिक वारशाची आठवण करून देणेही पुरेसे ठरते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या फिलीपींस दौऱ्यातून हाच संदेश जगासमोर आला आहे. संस्कृती ही केवळ भूतकाळाची ओळख नसून, ती भविष्याकालीन जागतिक मैत्रीचा मजबूत पाया ठरू शकते.

शतकातून एकदाच जन्माला येतो असा खेळाडू! धोनीची नवी इनिंग; मैदानावरील 'थला' आता चेन्नईचा मार्गदर्शक

पिवळ्या जर्सीतील प्रवासाला नवे वळण; पाच आयपीएल विजेतेपदांचा शिल्पकार आता नव्या पिढीचा आधार : खेळाडू म्हणून संपन्न झालेली कारकीर्द, पण चेन्नईशी असलेले नाते कायम !

डॉ.दत्ता विघावे क्रिकेट समिक्षक

क्रिकेटच्या इतिहासात अनेक महान खेळाडू होऊन गेले, अनेकांनी विक्रमांचे डोंगर उभे केले, अनेकांनी विश्वविजेतेपदे पटकावली; परंतु काही खेळाडू केवळ आपल्या कामगिरीने नव्हे, तर व्यक्तिमत्त्वाने, नेतृत्वाने आणि चाहत्यांच्या मनावर अधिराज्य गाजवण्याच्या क्षमतेने अजरामर होतात. महेंद्रसिंग धोनी हे अशाच दुर्मीळ व्यक्तिमत्त्वापैकी एक नाव! भारतीय क्रिकेटला विश्वविजेतेपदांचा आनंद देणारा, आयपीएलमध्ये चेन्नई सुपर किंग्सला यशाच्या शिखरावर नेणारा आणि लाखो चाहत्यांच्या गळ्यातील ताईत बनलेला हा 'माही' आता आपल्या कारकिर्दीच्या नव्या पर्वात प्रवेश करत आहे. चेन्नई सुपर किंग्सने धोनीची 'टीम मेंटॉर' अर्थात संघ मार्गदर्शक म्हणून नवी भूमिका जाहीर केली आहे. त्यामुळे मैदानावर पिवळ्या जर्सीतून आपल्या फलंदाजीने आणि नेतृत्वाने प्रतिस्पर्ध्यांना आव्हान देणारा 'थला' आता चेन्नईच्या भावी पिढीला घडवण्याची जबाबदारी स्वीकारणार आहे. ही केवळ एका पदाची घोषणा नाही, तर एका महान क्रिकेटपटूच्या अनुभवाचा आणि वारशाचा पुढील पिढीकडे होणारा हस्तांतरण सोहळा आहे.

चेन्नई सुपर किंग्सने समाजमाध्यमावरील 'एक्स' या व्यासपीठावरून धोनीच्या नव्या भूमिकेची घोषणा करताना अत्यंत भावनिक शब्दांत त्याच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली. असंख्य विजय, कठीण प्रसंग आणि अविस्मरणीय आठवणींसह धोनी सुरुवातीपासूनच संघाच्या प्रवासाचा अविभाज्य भाग राहिला आहे. संघाला विजयाच्या शिखरावर नेण्यापासून ते पुढील पिढीतील खेळाडूंना मार्गदर्शन करण्यापर्यंत त्याचे योगदान काय राहणार आहे. 'थला' हा केवळ चेन्नईचा खेळाडू नसून संघाच्या ओळखीचा एक अविभाज्य भाग आहे आणि चेन्नई हे त्याचे कायमचे घर आहे, अशी भावना फ्रँचायझीने व्यक्त केली.

यातून एक गोष्ट स्पष्ट होते की, धोनी आणि चेन्नई यांचे नाते करारापुरते, पदापुरते किंवा मैदानावरील कामगिरीपुरते मर्यादित नाही. ते विश्वासाचे, भावनेचे आणि परस्पर आदराचे नाते आहे.

'शतकातून एकदाच जन्माला येतो' : धोनीच्या योगदानाला मानाचा मुजरा !

चेन्नई सुपर किंग्सच्या मालक रूपा गुरुनाथ यांनी धोनीच्या योगदानाचे वर्णन करताना म्हटले आहे की, एम. एस. धोनीसारखा खेळाडू शतकातून एकदाच जन्माला येतो. चेन्नई सुपर किंग्सच्या स्थापनेपासून तो आमच्यासोबत आहे, हे आमचे भाग्य आहे. या संघाचा पाया घालण्यात त्याचा मोठा वाटा आहे. धोनी हा केवळ महान क्रिकेटपटू नसून त्यापेक्षाही अधिक काहीतरी आहे. मैदानावर आणि मैदानाबाहेर त्याने संघाला दिलेले योगदान अमूल्य आहे. त्याचे नेतृत्व, नम्रता, संघाप्रती असलेली निष्ठा, वचनबद्धता आणि लाखो चाहत्यांशी जोडलेले भावनिक नाते या गोष्टी विलक्षण आहेत. गेल्या अनेक वर्षांत त्याने केवळ विजेतेपदे मिळवली नाहीत, तर पिढ्यान्‌पिढ्या जपला जाईल असा वारसा निर्माण केला आहे, अशा शब्दांत रूपा गुरुनाथ यांनी धोनीचा गौरव केला. धोनीच्या मार्गदर्शकपदामुळे चेन्नईच्या तरुण खेळाडूंना त्याच्या प्रदीर्घ अनुभवाचा लाभ मिळेल.

क्रिकेटमधील दबावाचे क्षण कसे हाताळायचे, पराभवातून कसे सावरायचे, विजयाच्या उन्मादात पाय जमिनीवर कसे ठेवायचे आणि संघहिताला वैयक्तिक महत्त्वाकांक्षेपेक्षा अधिक प्राधान्य कसे द्यायचे, याचे धडे त्याच्याकडून नव्या खेळाडूंना मिळू शकतील. विशेष म्हणजे, धोनीच्या मार्गदर्शनाचा फायदा केवळ तांत्रिक कौशल्यापुरता मर्यादित राहणार नाही; तर खेळाडूंच्या मानसिक जडणघडणीलाही त्याची मदत होईल. चेन्नई सुपर किंग्सचे व्यवस्थापकीय संचालक के. एस. विश्वनाथन यांनीही धोनीच्या चेन्नईशी असलेल्या नात्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या मते, धोनीने केवळ चेन्नईसाठी क्रिकेट खेळले नाही, तर त्याने या शहराला पूर्णपणे आपलेसे केले आणि चेन्नईकरांनीही त्याला आपलासा केला. भविष्यात मागे वळून पाहताना विजेतेपदांच्या ट्रॉफी नक्कीच आठवतील; परंतु त्या विजयांपर्यंत पोहोचण्याची पद्धत आणि त्यामागील संघभावना हाच धोनीचा खरा वारसा असेल. ही टिपणी धोनीच्या नेतृत्वाचे सार सांगणारी आहे. कारण त्याने चेन्नईला केवळ जिंकायला शिकवले नाही, तर जिंकण्याची संस्कृती दिली.

२००८ पासून चेन्नईशी अतूट नाते!

२००८ मध्ये इंडियन प्रीमियर लीगची सुरुवात झाली आणि त्याच पहिल्या पर्वापासून महेंद्रसिंग धोनी चेन्नई सुपर किंग्सचा कर्णधार बनला. त्यावेळी धोनी भारतीय क्रिकेटमधील उदयोन्मुख नेतृत्व म्हणून ओळखला जात होता. २००७ च्या पहिल्या टी-२० विश्वचषकातील ऐतिहासिक विजयामुळे त्याची लोकप्रियता प्रचंड वाढली होती. त्याच्याकडे नेतृत्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आणि त्याने चेन्नईला आयपीएलमधील सर्वाधिक यशस्वी संघांपैकी एक बनविण्याचा पाया घातला. पहिल्याच हंगामात चेन्नईने अंतिम फेरी गाठली. मात्र राजस्थान रॉयल्सकडून पराभव स्वीकारावा लागला.

त्यानंतर २०१० आणि २०११ मध्ये सलग दोन वेळा विजेतेपद पटकावत धोनीने आपल्या नेतृत्वाची ताकद सिद्ध केली. २०१० मध्ये चॅम्पियन्स लीग टी-२० चे विजेतेपदही चेन्नईने मिळवले. मात्र हा प्रवास नेहमीच गुलाबाच्या पाकळ्यांवरून झालेला नव्हता. २०१३ मधील आयपीएल स्पॉट फिक्सिंग आणि सट्टेबाजी प्रकरणानंतर चेन्नई सुपर किंग्सवर जुलै २०१५ मध्ये दोन वर्षांची बंदी घालण्यात आली. परिणामी २०१६ आणि २०१७ या दोन हंगामांत चेन्नईला आयपीएलपासून दूर राहावे लागले. संघाचे अस्तित्वच जणू काही काळासाठी थांबले होते. या काळात धोनीला चेन्नईची जर्सी सोडून रायझिंग पुणे सुपरजायंट संघाकडून खेळावे लागले.

२०१६ मध्ये त्याने पुण्याचे नेतृत्व केले; मात्र पुढील हंगामात त्याच्याकडून कर्णधारपद काढून घेण्यात आले. २०१७ मध्ये स्टीव्ह स्मिथच्या नेतृत्वाखाली पुण्याने अंतिम फेरी गाठली. धोनीसाठी हा काळ आव्हानात्मक असला, तरी त्याने आपला व्यावसायिक दृष्टिकोन कायम ठेवला. जुलै २०१७ मध्ये बीसीसीआयने चेन्नई सुपर किंग्सचा पुनरागमनाची अधिकृत घोषणा केली. २०१८ मध्ये चेन्नईने पुन्हा आयपीएलमध्ये प्रवेश केला आणि पहिल्याच हंगामात विजेतेपद पटकावून टीकाकारांना चोख उत्तर दिले. विशेष म्हणजे, दोन वर्षांच्या अनुपस्थितीनंतरही चेन्नईच्या चाहत्यांचे प्रेम आणि संघावरील विश्वास तसूभरही कमी झाला नव्हता. धोनीच्या नेतृत्वाखालील त्या पुनरागमनाने आयपीएलच्या इतिहासात एक वेगळाच अध्याय लिहिला.

– ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com / ई-पेपर : epaper.sinhvani.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

कंपन्यांच्या सामाजिक दायित्व निधीतून टंचाई निवारणाची कामे

दुष्काळ निवारण कामांचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा, खनिजमधूनही निधी उपलब्ध करणार

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

एलनिनोचा प्रभाव आणि कमी पर्जन्यमानामुळे निर्माण झालेली पाणी टंचाई स्थिती हाताळण्यासाठी कंपन्यांच्या सामाजिक दायित्व निधीची मदत घेतली जाणार आहे. या निधीतून नाला खोलिकरण आणि तलावांमधील गाळ काढण्याचे प्रस्तावित असून यासाठी कंपन्यांकडून निधी मिळविण्याबाबत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेतली. बैठकीला अप्पर जिल्हाधिकारी प्रविण महिरे, खनिज, जलसंधारण, जलसंपदा, अग्रणी बँक आदी विभागाचे अधिकारी उपस्थित होते. दरवर्षी पाणी टंचाई निवारणाचा आराखडा तयार करून जानेवारीपासून त्याची अंमलबजावणी केली जाते. यावर्षी आतापासूनच काही ठिकाणी टंचाई स्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे



टंचाईची कामे आतापासूनच सुरु करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

नवीन जुन्या पाणी स्त्रोतांचे मजबुतीकरण

एलनिनोचा प्रभाव पुढेही राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे पाण्याचे नवीन स्त्रोत व अस्तित्वातील स्त्रोतांचे मजबुतीकरण महत्वाचे आहे. त्याअनुषंगाने कोल्हापुरी बंधाऱ्यांची दुरुस्ती कामे प्रस्तावित करावी. यावर्षी प्रथम टप्प्यात ४४ बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी ५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. प्राधान्यक्रम ठरवून इतर बंधारे देखील दुरुस्ती, गाळ काढण्यासाठी प्रस्तावित करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी केल्या.

खनिज निधीतून टंचाई प्रस्तावांना मंजुरी

जिल्हा खनिज निधीतून यावर्षी आपण पाणी टंचाई निवारणाची कामे घेणार आहोत. त्यासाठी जलसंधारण विभाग व लघु सिंचन विभागाने तातडीने प्रस्ताव सादर करावे. यातून प्राधान्याने नाला खोलीकरण, साठवण बंधारे, मामा व इतर तलावांच्या कामांना तत्काळ प्रशासकीय मान्यता घेऊन कामे सुरु करण्याचे निर्देश दिले.

जलजीवनच्या ६६ योजना सुरु होणार

जिल्ह्यात जलजीवन मिशन अंतर्गत घेण्यात आलेल्या ६६ पाणी पुरवठा योजनांची कामे पुर्ण झाली आहे. या योजनांना वीज कनेक्शन उपलब्ध झाल्यास योजना लगेच सुरु होऊ शकतात. त्यामुळे तातडीने कनेक्शन देण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्यात याव्या. यासाठी लागणारा निधी व प्रशासकीय मान्यता तातडीने घेण्याची सूचना केली.

टंचाई निवारण कामांसाठी यंत्रांचे दर

जिल्ह्यात पाणी टंचाई निवारणासाठी विविध कामे केली जाणार आहे. त्यासाठी जेसीबी, पोकलँड, टँकर, ट्रॅक्टर आदी यंत्र, वाहनांची गरज भासणार आहे. भविष्यातील किचकट आणि वेळखाऊ बाबी टाळण्यासाठी या सर्व यंत्रांचे दर निश्चित करण्यात येणार आहे. तशा सुचना बैठकीत संबंधित विभागांना देण्यात आल्या.

सीएसआर निधीसाठी कंपन्यांसोबत बैठक

कंपन्यांच्या सामाजिक दायित्व निधी अंतर्गत टंचाई निवारणासाठी निधी उपलब्ध होण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी काही कंपन्यांसोबत आज बैठक घेतली. विविध शासकीय कार्यालयांची खाती असलेल्या राष्ट्रीयकृत बँका तसेच मोठ्या सहकारी बँका, सोसायट्यांची देखील टंचाई निवारणासाठी मदत घेण्यासाठी पुढील आठवड्यात बैठक घेतली जाणार आहे.

गांगनेर येथे खेत बचाव अभियान



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

मंगळवार (ता.१७ नोव्हेंबर २०२६) रोजी चाचेर-निमखेडा जि प क्षेत्र अंतर्गत येणाऱ्या गांगनेर येथे कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) कृषी विभाग अंतर्गत खेत बचाओ अभियान कार्यक्रम राबविण्यात आले. या अभियानाचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांमध्ये शेतीचे संरक्षण, जमिनीची सुपीकता टिकविणे, पीक व्यवस्थापन आणि शेतीचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत जनजागृती करणे हा आहे.या कार्यक्रमादरम्यान शेतकऱ्यांना शेतीचे महत्त्व, मृदसंधारण,पाणी व्यवस्थापन,पीक संरक्षण तसेच शेतीमध्ये योग्य कृषी पद्धतींचा अवलंब करण्याबाबत मार्गदर्शन डॉ. किशोर त्रिभुवन, डॉ. जयकुमार वर्धन सीआयसीआर नागपूर केंद्रीय कपास प्राधनिकी अनुसंधान संथान,नागपूर यांनी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच हेमंत पिकलमुंडे यांनी बीआरसी अंतर्गत तयार करण्यात येणाऱ्या सेंद्रिय निविष्ठा याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच प्रशांत शेंडे यांनी खेत बचाओ मोहीम अंतर्गत मार्गदर्शन केले. शेतकऱ्यांनी आधुनिक तसेच शाश्वत कृषी तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीचे उत्पादन व उत्पादकता वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत व या अभियानाच्या माध्यमातून शेतकऱ्यांमध्ये जागरूकता निर्माण करून शेतीचे संरक्षण आणि शाश्वत शेतीला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करण्यात यावे याबाबत माहिती देण्यात आली.

भीमराव जुमडे, सहाय्यक कृषी अधिकारी यांनी सदर कार्यक्रमादरम्यान महिला शेतकरी प्रमाणपत्र नोंदणी,महा विस्तार एआय ॲप, फार्मर आयडी, अलनिनोचा प्रभाव,रब्बी हंगामातील कमी पाण्याची पिके लागवड,शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीचे महत्त्व,मृदसंधारण,पाणी व्यवस्थापन, पीक संरक्षण तसेच शेतीमध्ये योग्य कृषी पद्धतींचा अवलंब करण्याबाबत व शेतकऱ्यांनी आधुनिक तसेच शाश्वत कृषी तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीचे उत्पादन व उत्पादकता वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत याबाबत मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्रदीप राऊत माजी सरपंच, श्रीधर वाघमारे सह महिला व

रोहित पवारांचे आरोप म्हणजे स्वस्त प्रसिद्धीसाठीचा राजकीय स्टंट; गडचिरोली राष्ट्रवादीचा तीव्र निषेध

खोटे नॅरेटीव्ह सेट करणे थांबवावे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा जिल्हाध्यक्ष रवींद्र वासेकर यांचा इशारा

दै. सिंहवाणी वृत्त, गडचिरोली

स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या दुर्दैवी अपघातासारख्या अत्यंत संवेदनशील विषयाचा वापर आमदार रोहित राजेंद्र पवार हे केवळ राजकीय स्वार्थासाठी आणि स्वस्त प्रसिद्धीसाठी करत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच महायुती सरकारवर खोटे, निराधार आणि बिनबुडाचे आरोप करून जनतेची दिशाभूल करणाऱ्या रोहित पवारांचा गडचिरोली जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने तीव्र शब्दांत निषेध करण्यात येत आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) जिल्हाध्यक्ष रवींद्र वासेकर यांनी दिली.

आज (दि. १८ नोव्हेंबर) गडचिरोली येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधत आणि पक्षाचे प्रसिद्धीपत्रक जारी करत रोहित पवारांच्या आरोपांचा खरपूस समाचार घेतला.

रवींद्र वासेकर म्हणाले की,



अजितदादा पवार यांचे अपघाती निधन संपूर्ण महाराष्ट्रासाठी आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रत्येक कार्यकर्त्यासाठी कधीही न भरून निघणारी हानी आहे. या घटनेची सखोल व निष्पक्ष चौकशी होऊन सत्य जनतेसमोर यावे, ही आमच्या पक्षाची आणि महायुती सरकारची ठाम भूमिका आहे. त्यासाठी उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादीच्या शिष्टमंडळाने स्वतः केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन सीआयडी आणि गरज भासल्यास सीबीआय चौकशीची मागणी केली आहे. सध्या सीआयडी, डीजीसीए आणि संबंधित केंद्रीय यंत्रणांमार्फत कायदेशीर प्रक्रियेनुसार तपास सुरू आहे. या प्रकरणातील दोषींना कठोरात कठोर शासन केले जाईल व कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही, असे अधिवेशनात आणि पुण्यातील पुतळा अनावरण सभेमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे.

रोहित पवारांनी विमान कंपनीचे मालक व्ही. के. सिंग यांना पाठीशी घातले जात असल्याचा केलेला आरोप वासेकर यांनी फेटाळून लावला. संबंधित विमान कंपनीची सेवा २०१३ पासून देशातील व राज्यातील सर्वच राजकीय पक्षांचे नेते आणि प्रशासन घेत आले आहे. एखाद्याच्या लग्नसमारंभाला किंवा कौटुंबिक कार्यक्रमाला उपस्थित राहणे हा सामाजिक शिष्टाचाराचा भाग असतो; मात्र कोणताही ठोस पुरावा नसताना जुने फोटो दाखवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि वरिष्ठ नेत्यांना बदनाम करण्याचे षडयंत्र रचले जात आहे. अजितदादांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या अनावरणासारख्या भावनिक आणि महत्त्वाच्या दिवशी माध्यमांचे लक्ष विचलित करण्यासाठीच रोहित पवारांनी हा राजकीय स्टंट केला असल्याचा आरोप त्यांनी केला.सध्या राज्यात दुष्काळसदृश परिस्थिती असताना महायुती सरकार शेतकऱ्यांना हेक्टरी २० हजारांवरून ३२ हजार रुपयांपर्यंत मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील आहे. दुसरीकडे, विरोधक केवळ माध्यमांमध्ये झळकण्याच्या शोकापोटी राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते खा. सुनील तटकरे आणि खा. प्रफुल पटेल यांच्यावरही बिनबुडाचे आरोप करून संभ्रम निर्माण करत आहेत.

हा देश डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानावर चालतो. त्यामुळे गडचिरोलीसारख्या दुर्गम जिल्ह्याच्या विकासासाठी कटिबद्ध असलेल्या महायुती सरकारविरोधात खोटे नॅरेटीव्ह सेट करणे रोहित पवारांनी तात्काळ थांबवावे, अन्यथा गडचिरोली जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही रवींद्र वासेकर यांनी दिला आहे. पत्रकार परिषद ला रवींद्र वासेकर, पापडकर, माजी नगराध्यक्ष प्रमोद वैद्य, कार्याध्यक्ष नंदू नरोटे, पिंकू बावणे आदी उपस्थित होते.

मानेवाडा येथील श्रीहरीनगर -२ येथे भागवत कथा प्रवचन सप्ताह उत्साहात

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

भागवत कथा आयोजन समिती, श्रीहरी नगर - २,नागपूर तर्फे श्री. शिव व संकटमोचन हनुमान मंदिर, श्रीहरीनगर, मानेवाडा नागपूर येथे दिनांक १० ते १७ नोव्हेंबर या दरम्यान भव्य संगीतमय भागवत कथा प्रवचन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी भागवताचार्य ह.भ.प.श्री.संतोष निंबाळकर महाराज (आळंदीकर) यांनी या दरम्यान दररोज सकाळी काकडा, दुपारी भागवत कथा व सायंकाळी हरिपाठ या दैनंदिन संगीतमय, कृतीयुक्त, व मनोरंजनात्मक कार्यक्रमांद्वारे भगवंतांच्या



लीलांचे, संतांचे, थोरपुरुषांचे, शूरविरांच्या कार्याचे दाखले देऊन "मनुष्याने जीवन कसे जगावे" या विषयाचे महत्त्व पटवून देऊन भक्तमंडळींना मंत्रमुग्ध केले.

महाराजांच्या सोबतीला लक्ष्मण महाराज सकर्डे (झाकी दर्शन), पौरोहित रामेश्वर महाराज ठाकरे, निळकंठ महाराज गायकी (गायन), हरिपाठाचार्य मारोती महाराज काकडे, काकडाचार्य सुधाकर महाराज हिवरे, ऑर्गनवादक संदीप महाराज बुरगे, पॅड वादक गिरीश महाराज बुरगे, तबला- मृदंग वादक अक्षय महाराज चालपे, टाळकरी नाना महाराज ईवनाती यांची संगत लाभली.

दररोज दुपारी सातही दिवस वेगवेगळ्या भागातील भजन मंडळींनी निरनिराळ्या चालीतील भजने गाऊन 'या पिढीतील तरुणांना भजनातून ' समाज प्रबोधनाचे महत्त्व 'पटवून दिले. १४ नोव्हेंबर रोज शनिवारला श्रीनगर जेष्ठ नागरिक मंडळाच्यावतीने डॉ. हर्षवर्धन कांबळे यांच्या उपस्थितीत 'मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन 'करण्यात आले होते, डॉ. राजीव मिश्रा सचिव, ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठान नागपूर यांनी कार्यक्रमास सदिच्छा भेट देऊन सविस्तर मार्गदर्शन केले.

या भागाच्या नगरसेविका व नागपूर परिवहन विभागाच्या सभापती मंगलाताई खेकरे मॅडम यांनी सदिच्छा भेट देऊन आयोजन समितीच्या सदस्यांचे व श्रीहरी नगर ज्येष्ठ नागरिक मंडळात उत्साहाने कार्य करणाऱ्या सदस्यांचे भरभरून कौतुक केले व उत्तरोत्तर मंडळाची अशीच प्रगती होत राहील, याबाबतच्या शुभेच्छा व्यक्त केल्या.

१७ नोव्हेंबर रोजी मंगळवारला सकाळी "ग्रंथदिंडी" काढण्यात आली. त्यानंतर लगेच काल्याचे किर्तन करण्यात आले.

सायंकाळी नगरातील भक्तमंडळींनी स्वादिष्ट महाप्रसादाचा लाभ घेतला. हा पूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीहरीनगर जेष्ठ नागरिक मंडळाचे पदाधिकारी सुरेशराव ऊरकुडे, विठ्ठलराव घोडे, शिवराम गुरनूले, डॉ. अशोक मंदे, प्रवीण सुरकर, अशोक माहूरे, जयरामसिंग ठाकूर, डॉ.सोहन चावरे, छोटू जगनाडे, गणेश भारद्वाज, केशवराव बोपूलकर, नंदकिशोर शिंगनजुडे, रामदास कोल्हे, जानराव बारई घनश्याम ढोले, विजयजी लोणारे, मोरेश्वर ढोबळे, सुशील दहेकर, रवींद्र नखाते, हरीश लाकडे, रामकृष्णा कोल्हे, आनंद सेलूकर, नामदेवराव खाटके, कवडूजी ईटणकर, डॉ. प्रदीप काळे, स्वप्नील उरकुडे, राजेंद्र सुळके, प्रतीक लांजेवार, मनीष सुळके, ईश्वर पिसाळ, मंगलाताई ऊरकुडे, आशा माहुरे, पुष्पा सुरकर, मीनाक्षी मंदे,लांजेवार मॅडम, अपर्णा सुळके, वैशाली ऊरकुडे, लाकडे, अश्विनी उरकुडे व सर्व भक्तमंडळीचे मोलाचे सहकार्य लाभले.

थोडक्यात

अभिजीत जोशी यांची भाजप महाराष्ट्र प्रदेश आयटी प्रकोष्ठाच्या संयोजकपदी नियुक्ती

वाडीतील अभिजीत जोशी यांच्यावर प्रदेशस्तरीय जबाबदारी; वाडी परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव

दै. सिंहवाणी वृत्त, वाडी

भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेशाच्या संघटनात्मक नियुक्त्यांमध्ये वाडी येथील अभिजीत जोशी यांची महाराष्ट्र प्रदेश आयटी प्रकोष्ठाच्या संयोजकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.



भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी १७ नोव्हेंबर २०२६ रोजी अधिकृत नियुक्तीपत्राद्वारे ही घोषणा केली. अभिजीत जोशी हे दत्तवाडी परिसरात सीएससी केंद्र व संगणक प्रशिक्षण केंद्र संचालित करतात. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील अनुभवाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्यावर ही प्रदेशस्तरीय जबाबदारी सोपविण्यात आली आहे. नवीन जबाबदारीअंतर्गत राज्यातील आयटी प्रकोष्ठाचे संघटनात्मक बळकटीकरण, डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर, सोशल मीडिया समन्वय तसेच पक्षाच्या प्रचार व संघटनात्मक कामकाजात माहिती तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्याचे काम त्यांच्याकडे राहणार आहे.

तसेच पक्षाची अधिकृत भूमिका, ध्येयधोरणे आणि विविध उपक्रम डिजिटल माध्यमांतून जनतेपर्यंत पोहोचविणे व राज्यभरातील आयटी प्रकोष्ठाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये समन्वय राखण्याची जबाबदारीही ते पार पाडणार आहेत. अभिजीत जोशी यांच्या नियुक्तीमुळे वाडी परिसराला राज्यस्तरावर प्रतिनिधित्व मिळाले असून, त्यांच्या निवडीबद्दल भाजपचे वरिष्ठ नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा संप दुसऱ्या दिवशीही कायम

तोडगा न निघाल्याने न्यायालयीन कामकाज प्रभावित; पक्षकारांसह वकिलांचीही गैरसोय



दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर

उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणेच दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांनाही समान वेतन लागू करावे, या प्रमुख मागणीसाठी राज्यभरातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी पुकारलेला बेमुदत संप बुधवारी दुसऱ्या दिवशीही सुरूच राहिला. संपावर तोडगा काढण्यासाठी अद्याप कोणताही निर्णय न झाल्याने भिवापूर दिवाणी व फौजदारी न्यायालयातील कामकाजावरही त्याचा परिणाम झाला. मंगळवार, १७ नोव्हेंबरपासून सुरू झालेल्या या संपात राज्यातील सुमारे ३४ हजार न्यायालयीन कर्मचारी सहभागी झाले आहेत. संपामुळे न्यायालयीन कामकाजाची प्रशासकीय यंत्रणा ठप्प झाली असून, अनेक नियमित कामांना खीळ बसली आहे. भिवापूर न्यायालयातही मंगळवारी निर्माण झालेली परिस्थिती बुधवारी कायम होती.

बुधवारी ज्या प्रकरणांच्या सुनावण्या नियोजित होत्या, त्या प्रकरणांतील पक्षकार आणि वकिलांना न्यायालयात उपस्थित राहूनही पुढील तारखा घेऊन परतावे लागले. त्यामुळे न्यायालयीन कामासाठी दूरवरून आलेल्या पक्षकारांची विशेष गैरसोय झाली. न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे दैनंदिन कामकाजावर मयार्दा आल्याचे चित्र होते. दरम्यान, न्यायाधीश कुमारी युक्ता कडू या मंगळवारप्रमाणे बुधवारीही न्यायालयात उपस्थित होत्या. दरम्यान, संपावर तोडगा काढण्यासाठी बुधवारी रात्री महत्त्वाची बैठक होणार असल्याची माहिती असून, या बैठकीत सकारात्मक निर्णय होण्याची शक्यता वर्तविण्यात येते आहे. मात्र, मागण्यांबाबत ठोस निर्णय होईपर्यंत संप मागे घेतला जाणार की नाही, याकडे राज्यातील न्यायालयीन कर्मचारी, वकील आणि पक्षकारांचे लक्ष लागले आहे.

शिवनी येथे क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा यांची १५१ वी जयंती साजरी



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

खात - रेवराल जि प क्षेत्रातील गट ग्रा पं घोटमुंढरी अंतर्गत येणाऱ्या शिवनी येथे आदिवासी समाजाचे महानायक, क्रांतिकारक आणि जननायक भगवान बिरसा मुंडा यांची १५१ वी जयंती मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरी करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी भगवान बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी केलेला संघर्ष, समाजाच्या स्वाभिमानासाठी दिलेला लढा, तसेच जल, जंगल आणि जमीन यांच्या रक्षणासाठी केलेल्या ऐतिहासिक कार्याबद्दल मार्गदर्शन केले.भगवान बिरसा मुंडा यांचे जीवन म्हणजे अन्यायाविरुद्ध संघर्ष, स्वाभिमान, त्याग आणि समाजजागृतीचा प्रेरणादायी इतिहास आहे. त्यांचे विचार आणि कार्य येणाऱ्या अनेक पिढ्यांना सदैव प्रेरणा देत राहतील.

याप्रसंगी माजी भाजपा मौदा तालुकाध्यक्ष तथा माजी पं स सदस्य मौदा मुकेश अग्रवाल,माजी जि. प सदस्या राधा मुकेश अग्रवाल, सरपंच अदासा संजय आतीलकर,माजी उपसरपंच, घोटमुंढरी गोरखनाथ मडावी, पोलीस पाटील शालिनी गजभिये,माजी ग्रा पं सदस्य मिलिंद गजभिये, प्रतिष्ठित नागरिक अशोक दळणे, देवा मडावी, देवराव दळणे,राजू नेताम सह आदिवासी समाज बांधव-भगिनी, बालगोपाल आणि गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विशेष लोक अदालत २१ नोव्हेंबर रोजी

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर : जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने २१ नोव्हेंबर रोजी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष सलमान एम. आझमी यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये जिल्ह्यातील हजारो न्यायालयीन प्रलंबित व दाखलपूर्व प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत. सर्व संबंधित पक्षकारांनी लोक अदालतीमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होऊन लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्यायाधीश प्रविण उन्हाळे यांनी केले आहे.

थोडक्यात

गोरखनाथ मंदिराच्या संरक्षणासाठी भक्तांना एकत्र येण्याचे आवाहन



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

जागनाथ बुधवारी येथील महायोगी गोरखनाथ मंदिर आणि लकडगंजमधील विमलेश्वरनाथ मंदिराच्या जागा व विकासाच्या प्रश्नावर जनजागृती करण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रिय नाथजोगी समाजसुधार संस्था तथा गोरखनाथ मंदिर सेवा समितीने रविवार, २२ नोव्हेंबर रोजी गोरखनाथ प्रकटदिनानिमित्त जास्तीत जास्त भक्तांनी मंदिरात उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे. १३ ऑक्टोबर रोजी झालेल्या पत्रकार परिषदेत संस्थेने मंदिरांच्या जागा, अतिक्रमण आणि विकासाचे मुद्दे प्रशासनासमोर मांडले होते. मंदिराची परिस्थिती पाहून या भूमिकेवर काही भक्तांनी ठाकरे यांची नाराजी व्यक्त केली असली तरी कोणाच्याही भावना दुखावण्याचा संस्थेचा हेतू नसल्याचे स्पष्ट करण्यात आले.

मंदिरांचे अस्तित्व टिकावे, अतिक्रमणाची निष्पक्ष चौकशी व्हावी आणि मंदिरांचा विकास व्हावा, हीच संस्थेची भूमिका आहे. त्यामुळे भक्तांनी वाद किंवा उद्रेक न करता शांततेच्या आणि कायदेशीर मार्गाने मंदिरांच्या संरक्षणासाठी एकत्र यावे, असे आवाहन संस्थेने केले आहे. पत्रकार परिषदेला उपस्थित मंचावरील शंकरनाथ जाधव, रणजीत राऊत, मनीष पुंड, मनोहर माळवे, सारंग साकरे यांची उपस्थिती होती.

श्री सुब्रमण्यम स्वामी यांच्या दिव्य कल्याणम् सोहळा

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

सन १८७४ मध्ये स्थापन झालेल्या श्री सुब्रमण्यम देवस्थान (श्री गणेश कार्तिक मंदिर) यांच्या वतीने भगवान श्री सुब्रमण्यम स्वामी आणि त्यांच्या दिव्य पत्नी देवी वल्ली व देवी देवयानी यांच्या पवित्र विवाह सोहळ्याचे श्री सुब्रमण्यम स्वामी कल्याणम् भव्य आयोजन संगम मंदिर, राणी झाशी चौक, सीताबर्डी, नागपूर येथे करण्यात आले आहे.या धार्मिक सोहळ्याचा शुभारंभ रविवार, २२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता. भव्य शोभायात्रेने होणार आहे. ही शोभायात्रा भगवती मंदिर, यशवंत स्टेडियम येथून प्रारंभ होऊन संगम मंदिर येथे पोहोचेल. त्यानंतर प्रसाद वितरण करण्यात येईल.



मुख्य धार्मिक कार्यक्रम श्री सुब्रमण्यम स्वामी कल्याणम् सोमवार, २३ नोव्हेंबर २०२६ रोजी संगम मंदिर येथे संपन्न होईल. विवाहाचा शुभ मुहूर्त सकाळी ९.४५ ते १०.२० या वेळेत आहे.त्यानंतर सकाळी ११ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.यावेळी अन्य धार्मिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे. श्री कार्तिक स्वामी दर्शनम्: सोमवार, २३ नोव्हेंबर रोजी रात्री ११.४२ वाजल्यापासून मंगळवार, २४ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री ८.२३ वाजेपर्यंत. अन्नामलाई दीपम्: मंगळवार, २४ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ७ ते रात्री ८.३० वाजेपर्यंत. त्यानंतर प्रसाद वितरण करण्यात येईल. या पवित्र धार्मिक सोहळ्याच्या निमित्ताने भाविकांना या दिव्य उत्सवात सहभागी होऊन भगवान श्री सुब्रमण्यम स्वामी, देवी वल्ली आणि देवी देवयानी यांचे आशीर्वाद प्राप्त करण्याची संधी लाभणार आहे. देवस्थान व्यवस्थापनाच्या वतीने सर्व भाविक, धर्मप्रेमी नागरिक आणि हितचिंतकांना आपल्या कुटुंबीयांसह या पवित्र सोहळ्यात सहभागी होऊन कार्यक्रमाची शोभा वाढवावी व सोहळा यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

खैरे कुणबी समाज पश्चिम नागपूरच्यावतीने उपवर-वधू परिचय मेळावा व ज्येष्ठांचा सत्कार सोहळा २२ नाव्हेंबरला

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

खैरे कुणबी समाज पश्चिम नागपूर संघटनेच्यावतीने रविवार, दिनांक २२ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता श्रीमती कुरुसमवार नाट्यगृह, नागपूर येथे विदर्भस्तरीय खैरे कुणबी समाज उपवर-वधू परिचय मेळावा, ज्येष्ठांचा सत्कार आणि स्नेह मिलन सोहळा-२०२६ आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून समाजातील विवाहयोग्य युवक-युवतींना परिचयाची संधी उपलब्ध करून देणे, विवाह जुळविण्याच्या प्रक्रियेला चालना देणे तसेच समाजातील ज्येष्ठ व्यक्तींचा सन्मान करून त्यांच्या कार्याचा गौरव करणे, हा आयोजनामागील मुख्य उद्देश आहे.

या सोहळ्याला समाजातील मान्यवर, प्रतिष्ठित व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक तसेच समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन या कार्यक्रमाची शोभा वाढवावी आणि सामाजिक एकोपा व बंधुभाव वृद्धिंगत करावा, असे आवाहन आयोजन समितीच्यावतीने करण्यात आले आहे. समाजातील युवक-युवती, पालक आणि सर्व समाजबांधवांनी या उपवर-वधू परिचय मेळावा व स्नेह मिलन सोहळ्यात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आयोजकांनी आवाहन केले आहे.

तूमान येथे मंडई निमित्त 'आनंदाचा शिधा... आनंदाचं तोरण'

दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

शिवसेना नेते, महाराष्ट्राचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या पुढाकारातून आणि शिवसेना पक्षाच्यावतीने 'आनंदाचा शिधा..आनंदाच तोरण'उपक्रमांतर्गत चाचेर - निमखेडा जि प क्षेत्रातील तुमान येथे मंडई निमित्त आनंदाचा शिधा वाटपाचा उपक्रम तुमान गावात उत्साहात पार पडला. गावातील प्रत्येक दिव्यांग व गरजू कुटुंबापर्यंत दिवाळी पंचमी निमित्त आयोजित मंडईचा आनंद पोहोचावा, हाच या उपक्रमामागचा खरा उद्देश, असल्याचे तुमान येथील शिवसेनेचे सामाजिक कार्यकर्ते शुभम पटिये यांनी सांगितले.



'काजळकाठ'च्या निमित्ताने यामिनी दळवींशी रंगल्या दिलखुलास काव्यगप्पा

कविता म्हणजे भावनेचा उत्स्फूर्त आविष्कार : यामिनी दळवी



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

कविता म्हणजे भावनेचा उत्स्फूर्त आविष्कार आणि शब्दांचे शिल्प असते. कवीच्या मनातील अस्वस्थता, मानवी नात्यांचे विविध पैलू आणि आयुष्याला भिडलेल्या अनुभवांतून कविता आकार घेत असते, असे मत प्रसिद्ध कवयित्री, पत्रकार आणि निवेदिका यामिनी दळवी यांनी व्यक्त केले.

विदर्भ साहित्य संघाच्यावतीने आयोजित झपुर्झा साहित्य कट्टयात आयोजित दिलखुलास काव्यसंवादात त्या बोलत होत्या. एबीपी माझाच्या वृत्तनिवेदिका यामिनी दळवी यांच्या काजळकाठ या कवितासंग्रहाच्या दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

विदर्भ साहित्य संघाच्या ग्रंथालयात रंगलेल्या या काव्यगप्पांची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी यामिनी दळवी, कवयित्री मनिषा अतुल, विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी, उपाध्यक्ष अरुणा सबाणे व बाळ कुलकर्णी, कोषाध्यक्ष माधुरी साकुळकर, कवी तुषार जोशी, अनिल इंदाणे आणि वसंत वाहोकर यांची उपस्थित होती.

साहित्याची मोठी पार्श्वभूमी नसलेल्या मध्यमवर्गीय कुटुंबात वाढताना आई-वडिलांकडून मिळालेली साथ, शालेय-महाविद्यालयीन जीवनातील मार्गदर्शकांची भूमिका, वाचनाची आवड आणि विविध क्षेत्रांतील माणसांच्या सहवासातून झालेली जडणघडण याविषयी त्यांनी रंजक आठवणी सांगितल्या.

आयुष्यातील अस्वस्थ करणारे क्षण, मानवी नात्यांचे विविध पैलू, प्रेमाचे बदलते रंग, नात्यांमधील परिपक्वता आणि काळानुसार बदलणाऱ्या अनुभवांचा वेध त्यांनी घेतला. कवितेशिवाय या कवितेतील तू नसतीस तर आयुष्याच्या घेंगा घेऊन कुठे फिरले असते जन्मभर? या ओळींसह प्रेमाची व्याख्या मांडणारी प्रेमाचं छप्पर ही रचनाही त्यांनी सादर केली. नात्यांमधील संवादहीनता आणि अस्वस्थ करणाऱ्या जाणिवांना त्यांनी विरामचिन्ह या कवितासंग्रहातून संवेदनशीलपणे मांडले आहे. संग्रहातील प्रत्येक कविता प्रत्यक्ष अनुभव आणि वास्तवातून जन्माला आल्याचे त्यांनी सांगितले. आपल्या परखड आणि संवेदनशील कवितांच्या माध्यमातून त्यांनी विज्ञान, तंत्रज्ञान, गरिबी आणि मानवी अस्तित्वाच्या वास्तवावरही भाष्य केले. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात रसिकांच्या आग्रहाखातर यामिनी दळवी यांनी आपल्या गाजलेल्या रचना सादर केल्या. त्यांच्या संवेदनशील काव्यवाचनाला रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली.

कार्यक्रमाची प्रस्तावना तुषार जोशी यांनी केली. सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन शुभदा फडणवीस यांनी केले.

सीसीएमपी अभ्यासक्रमाच्या ऐतिहासिक निर्णयाबद्दल आमगाव मेडिकल असोसिएशनकडून महाराष्ट्र शासनाचे आभार

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांची असोसिएशनच्या प्रतिनिधी मंडळाने घेतली सदिच्छा भेट; होमिओपॅथिक डॉक्टरांच्या भविष्याबाबत विविध विषयांवर चर्चा



दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव

महाराष्ट्र शासनाने सन २०१४ मध्ये सुरू केलेल्या सीसीएमपी अभ्यासक्रमासंदर्भात तसेच हा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या पात्र होमिओपॅथिक डॉक्टरांना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल मध्ये नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल आमगाव मेडिकल असोसिएशनच्या वतीने महाराष्ट्र शासनाचे आभार व्यक्त करण्यात आले. या निर्णयाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आमगाव मेडिकल असोसिएशनच्या प्रतिनिधी मंडळाने राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांची सदिच्छा भेट घेतली.

यावेळी मंत्री आशिष जयस्वाल, गोंदिया-देवरी विधानसभा क्षेत्राचे आमदार संजय पुराम, माजी आमदार मनोहरराव चंद्रिकापुरे, सहसराम कोरोटे, सुरेंद्र नायडू तसेच डॉ. प्रशांत कटरे उपस्थित होते. आमगाव मेडिकल असोसिएशनच्या वतीने डॉ. टी. डी. कटरे, डॉ. जितेंद्र वाळके, डॉ. साजिद खान, डॉ. अफसर शेख, डॉ. अभय बोरकर, डॉ. ललित कलंत्री, डॉ. तारेश शेंडे, डॉ. संतोष येवले आणि कृष्णा राठी यांनी प्रतिनिधी मंडळात सहभाग घेतला.

यावेळी सीसीएमपी अभ्यासक्रमामुळे होमिओपॅथिक डॉक्टरांना उपलब्ध झालेल्या संधी, व्यावसायिक ओळख आणि महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमध्ये नोंदणीची सुविधा याबाबत समाधान व्यक्त करण्यात आले. तसेच होमिओपॅथिक डॉक्टरांचे भविष्य, व्यावसायिक हितसंबंध आणि त्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत मंत्री महोदयांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी प्रतिनिधी मंडळाचे म्हणणे गांभीर्याने ऐकून घेत सकारात्मक प्रतिसाद दिला. तसेच होमिओपॅथिक डॉक्टरांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. या सदिच्छा भेटीमुळे होमिओपॅथिक डॉक्टरांच्या प्रश्नांना शासनस्तरावर सकारात्मक दिशा मिळण्याची अपेक्षा आमगाव मेडिकल असोसिएशनने व्यक्त केली. या भेटीसाठी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह उपस्थित लोकप्रतिनिधींचे असोसिएशनच्या वतीने आभार मानण्यात आले.

शेतमाल कमी भावात विकू नका, तारण व गोदाम योजनेचा लाभ घ्या!

उमरेड बाजार समितीचा शेतकऱ्यांना दिलासा, केवळ साठवणुकीसाठीही गोदामाची सुविधा

दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड
मनिष शिंगणे



ज्या शेतकऱ्यांना सध्या पैशांची गरज नाही, मात्र आपला शेतमाल सुरक्षितपणे साठवून ठेवायचा आहे, अशा शेतकऱ्यांसाठी बाजार समितीने वेअरहाऊस योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत शेतकरी आपला शेतमाल बाजार समितीच्या गोदामात प्रति क्विंटल प्रति महिना केवळ १० रुपये या दराने साठवून ठेवू शकतात. यामुळे बाजारभाव अनुकूल होईपर्यंत शेतमाल सुरक्षित ठेवण्याचा पर्याय शेतकऱ्यांना उपलब्ध झाला आहे.

शेतकऱ्यांनी आपला शेतमाल कमी भावात विकण्याऐवजी शेतमाल तारण योजना व वेअरहाऊस योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समिती, उमरेडच्या वतीने करण्यात आले आहे.

सोयाबीन व चण्यावर ७० टक्क्यांपर्यंत कर्जाची सुविधा

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांच्या सहकार्याने बाजार समितीमार्फत शेतमाल तारण योजना राबविण्यात येत आहे. या योजनेत पात्र शेतकरी सोयाबीन व चणा हा शेतमाल बाजार समितीकडे तारण ठेवून त्याच्या किमतीच्या ७० टक्क्यांपर्यंत कर्ज घेऊ शकतात. त्यामुळे शेतमालाची तातडीने विक्री न करता आर्थिक गरज भागविणे शक्य होते.

शेतमालाचा दर्जानुसार बाजारातील प्रचलित दर किंवा किमान आधारभूत किंमत यापैकी जी कमी असेल, त्या किमतीच्या ७० टक्क्यांपर्यंत कर्ज उपलब्ध होऊ शकते. कर्जाची मुदत सहा महिने असून पहिल्या १८० दिवसांसाठी वार्षिक ६ टक्के व्याजदर आहे. १८० दिवसांनंतर शेतमाल विक्री न केल्यास अतिरिक्त २ टक्के व्याज आकारले जाते. विशेष म्हणजे तारण ठेवलेल्या शेतमालाची साठवणूक, देखरेख व सुरक्षिततेची व्यवस्था बाजार समितीमार्फत विनामूल्य केली जाते. त्यामुळे आर्थिक अडचणीच्या काळात शेतमाल कमी भावात विकण्याची वेळ शेतकऱ्यांवर येत नाही.


तारण योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

शेतमाल तारण योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांकडे चालू वर्षाचा पिकपेरा असलेला ७/१२ उतारा, आधार कार्ड आणि १०० रुपयांचा स्टॅम्प पेपर आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी आर्थिक गरज असल्यास शेतमाल कमी भावात विकण्याची घाई न करता उपलब्ध असलेल्या तारण योजनेचा लाभ घ्यावा. तसेच आर्थिक गरज नसलेल्या शेतकऱ्यांनी बाजारभाव वाढेपर्यंत शेतमाल सुरक्षित ठेवण्यासाठी वेअरहाऊस योजनेचा उपयोग करावा, असे आवाहन बाजार समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

अतिदुर्गम बोदली टोला गाव उजळले; १६ कुटुंबांच्या घरात पोहोचली वीज

दै. सिंहवाणी वृत्त, गडचिरोली

एटापल्ली तालुक्यातील अतिदुर्गम बोदली टोला गावातील १६ कुटुंबांच्या घरात वीज पोहोचली असून अनेक वर्षांपासून विजेच्या प्रतीक्षेत असलेल्या ग्रामस्थांना यामुळे दिलासा मिळाला आहे. जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे गावाच्या विद्युतीकरणाला गती मिळाली असून महावितरणच्या माध्यमातून हे काम पूर्ण करण्यात आले आहे. बोदली टोला गावाच्या विद्युतीकरणासाठी जिल्हा आदिवासी विकास उपयोजना सन २०२५-२६ अंतर्गत ३३ लाख ६० हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. या निधीतून २.५० किलोमीटर उच्चदाब वाहिनी, १ किलोमीटर लघुदाब वाहिनी आणि ६३ केव्हीए क्षमतेचे रोहित्र उभारण्यात आले. महावितरणने ४ नोव्हेंबर २०२६ रोजी विद्युतीकरणाचे काम पूर्ण केले.



यापूर्वी विजेअभावी ग्रामस्थांना दैनंदिन कामकाजात तसेच मुलांच्या शिक्षणात विविध अडचणींचा सामना करावा लागत होता. आता घरगुती वीजपुरवठा उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांना रात्री अभ्यास करणे सुलभ होणार असून शेतीशी संबंधित कामे आणि गावातील विकासात्मक उपक्रमांनाही चालना मिळण्याची अपेक्षा आहे. अतिदुर्गम भागातील मूलभूत सुविधा बळकट करण्याच्या दृष्टीने बोदली टोला येथील विद्युतीकरण महत्त्वपूर्ण ठरले आहे. यामुळे ग्रामस्थांच्या दैनंदिन जीवनात सुलभता येऊन त्यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडण्यास मदत होणार आहे, अशी माहिती महावितरणचे अधीक्षक अभियंता प्रकाश खांडेकर यांनी दिली आहे.

भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त व्याख्यानाचे आयोजन

आदिवासी क्रांतिकारकांच्या योगदानातून राष्ट्रप्रेम व स्वाभिमानाच्या प्रेरणेचे स्मरण

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त आयोजित 'जनजातीय गौरव दिवस सेवा सप्ताहा'अंतर्गत भारतीय स्वातंत्र्य चळवळ व राष्ट्रनिर्माणात आदिवासी समाजाचे योगदान या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

आदिवासी विकास विभाग, अपर आयुक्त आदिवासी विकास, नागपूर व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, यांच्या संयुक्त विद्यमाने व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले.



यावेळी प्रमुख वक्ते डॉ. श्यामराव कोरटे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्ष डॉ. मनाली क्षीरसागर तर डॉ.अखिलेश पेशवे, डॉ.विनय खंडारे, डॉ. विजयालक्ष्मी शेंडे यांची प्रमुख उपस्थिती उपस्थिती होती. आदिवासी समाजातील स्वातंत्र्यवीरांनी देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात दिलेले योगदान, त्यांचा संघर्ष, शौर्य, त्याग व बलिदान तसेच राष्ट्रनिर्मितीतील महत्त्वपूर्ण भूमिका याविषयी उपस्थितांनी मार्गदर्शन केले. भगवान बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी केलेला संघर्ष, सामाजिक जागृती आणि अन्यायाविरुद्ध उभारलेली चळवळ यांचा विशेष उल्लेख करण्यात आला.

आदिवासी समाजाचा गौरवशाली इतिहास, संस्कृती, परंपरा आणि राष्ट्राच्या उभारणीत असलेले योगदान नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. आदिवासी क्रांतिकारकांच्या जीवनकार्यापासून प्रेरणा घेऊन समाजात स्वाभिमान, राष्ट्रप्रेम, सामाजिक बांधिलकी आणि जागृती निर्माण व्हावी, तसेच त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढ्यांनी जतन करावा या उद्देशाने व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले.

क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून त्यांच्या क्रांतिकारी विचारांना उजाळा देत आदिवासी समाजाच्या ऐतिहासिक योगदानाचे यावेळी स्मरण करण्यात आले. व्याख्यानास विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

थोडक्यात

कांद्री सीमा तपासणी नाक्यावर वाद, चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

परिस्थिती हाताळतांना मोटार वाहन निरिक्षकास गंभीर दुखापत, प्रादेशिक परिवहन कार्यालयाची माहिती

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

सीमा तपासणी नाका, कांद्री येथे दिनांक १६ नोव्हेंबर रोजी दुपारी एका वाहनचालकाने त्याचे वाहन वजनकाट्याच्या लाईनमध्ये न घेता सेंट्रल लाईनमध्ये घेतल्याने चौकीदाराने वाहन रोखले. त्यानंतर वाद निर्माण झाला असता हा वाद हाताळतांना मोटार वाहन निरिक्षकास गंभीर दुखापत झाली असून संबंधित वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वाहनचालकाने थेट सेंट्रल लाईनमध्ये वाहन घेतल्यानंतर चौकीदाराने नियमानुसार रोखले असता चालकाने वाद घालण्यास सुरुवात केली. हा वाद विकोपास गेल्यानंतर जमलेल्या इतर वाहनचालकांनीही गोंधळ घातला. यामुळे शासकीय कामकाजात अडथळा निर्माण झाला. वाहनचालकांच्या या आक्रमक व तीव्र वर्तणुकीमुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली. ही परिस्थिती हाताळताना कांद्री सीमा तपासणी नाक्यावर कार्यरत असलेले मोटार वाहन निरीक्षक विवेक तास्के यांना गंभीर दुखापत झाली. त्यांच्या हाताला जबर मार लागून हाड तुटल्यामुळे त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. सद्य:स्थितीत त्यांची प्रकृती अत्यवस्थ असून त्यांच्यावर नागपूर येथील रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

घटनेनंतर पोलिस विभागाने तात्काळ हस्तक्षेप करून परिस्थितीवर नियंत्रण मिळवले. या प्रकरणी शासकीय कामात अडथळा आणणाऱ्या आणि कायदा सुव्यवस्था बिघडवणाऱ्या संबंधित वाहनचालकांविरुद्ध रामटेक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे नागपूर ग्रामीणचे प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय चव्हाण यांनी कळविले आहे.

आमगांव येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला मिळाले डॉ.मनमोहन सोनी यांचे नाव

दै. सिंहवाणी वृत्त, आमगांव

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार,उद्योजकता व नाविन्यता



विभागाने दिनांक १५ जानेवारी २०२५ रोजी शासन निर्णय क्रमांक आय टी आय - २०२४/प्र. क्र. १२४/व्यगश-३ नुसार राज्यातील १३२ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची नावे बदलण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार आमगांव येथील स्व. डॉ. मनमोहनजी सोनी यांनी केलेले समाज कार्य व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून घडलेले राष्ट्र संघटनचे कार्याची दखल घेत शासनाने आमगांव येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला डॉ. मनमोहनजी सोनी यांचे नाव देण्यात आले.

शिष्यवृत्ती परीक्षेत कु. समीक्षा राजू फुंडे हिची टॉप ४० मध्ये चमकदार कामगिरी!

सालेकसा तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा; एपीजे फ्युचुरा स्कूलची विद्यार्थिनी ठरली गुणवंत

दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा

सिद्धिविनायक इन्स्टिट्यूशन, गोंदिया यांच्या वतीने दिनांक १ नोव्हेंबर २०२६ रोजी गोंदिया येथे आयोजित करण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत एपीजे फ्युचुरा स्कूल, सालेकसा येथील इयत्ता दहावीची विद्यार्थिनी कु. समीक्षा राजू फुंडे हिने टॉप ४० मध्ये स्थान मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिच्या या यशामुळे सालेकसा तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाची भर पडली असून फुंडे कुटुंबीयांसह शाळा परिसरात आनंदाचे वातावरण आहे. अभ्यासातील सातत्य, मेहनत, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या जोरावर समीक्षाने हे यश प्राप्त केले आहे.



तिच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पालक, शिक्षक, शाळा व्यवस्थापन, नातेवाईक आणि मित्रपरिवाराकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. तसेच तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा दिल्या जात आहेत. कु. समीक्षा राजू फुंडे हिच्या या यशाने इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळणार असून तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीत ती अशीच यशाची नवनवीन शिखरे गाठो, हीच सदिच्छा दिली.

समान काम, समान वेतनाच्या मागणीसाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा आमगाव येथील न्यायालयासमोर बेमुदत संप सुरू!

दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव

महाराष्ट्र राज्य समस्त न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या नेतृत्वाखाली राज्यातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी समान काम, समान वेतन या प्रमुख मागणीसाठी आज १७ नोव्हेंबरपासून आमगाव येथील न्यायालयासमोर बेमुदत संप पुकारला आहे. उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार न्यायालयीन कर्मचाऱ्यांना समान कामासाठी समान वेतन मिळावे, अशी कर्मचाऱ्यांची मागणी आहे. या मागणीच्या पूर्ततेसाठी राज्यातील सर्व न्यायालयीन कर्मचारी संघटनांनी एकत्र येत आंदोलनाची भूमिका घेतली आहे.

या संपामध्ये महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघ गट-क, महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी लघुलेखक संघटना, महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी बेलिफ संघटना तसेच महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघ गट-ड या संघटनांचा सहभाग आहे. यावेळी श्रीमती एम. के. गाते, सी. ए. कावळे, व्ही. बी. मोहनकर, एन.बी. परिहार, पी. एस. फरकुंडे, ए.पी. जांभुळकर, वाय. एल.बोपचे, वाय. आर. बघेल, पी. एस. डहाट, डी. एस. कुथे, डी. एस. ठाकरे, एम. ए. फुलकुवर. डी. एस. ढोबले, एच. एम. लांडगे, एच.डी. टेंभेकर, यु. व्ही. जाधव, के. पी. बारी, जी.एम. नानहेत तसेच इत्यादी न्यायालयीन कर्मचारी उपस्थित होते.

शेतरस्ते, जलसंधारणासाठी लोकप्रतिनिधींनी निधी वापरावा

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आमदारांसोबत बैठक

दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई

राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता आमदार आणि खासदारांनी आपला निधी मृदसंधारण, चारा लागवड, गोवंश जिवंत ठेवण्यासह जनावरांसाठी पाण्याची सोय करण्यासाठी वापरावा अशी सूचना महसूलमंत्री व दुष्काळ निवारण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.

राज्याली सर्व खासदार आणि आमदारांशी महसूलमंत्री बावनकुळे यांनी ऑनलाईन संवाद साधत दुष्काळाशी सामना करण्याबाबत काही उपाययोजनाही सुचविल्या. त्यानंतर ते माध्यमांशी बोलत होते.

बावनकुळे म्हणाले, केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांचा लाभ मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी 'फार्मर आयडी' तयार करून घेणे आवश्यक आहे. राज्यातील सुमारे ५० लाख शेतकरी अद्याप या लाभापासून वंचित असल्याने त्यांना जाणीवपूर्वक मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच, २४ लाख शेतकऱ्यांची पीक पाहणी ऑफलाईन पद्धतीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ज्या शेतकऱ्यांचे केवायसी (ई-केवायसी) आणि पीक पाहणी प्रलंबित आहे, त्यांनी येत्या दोन महिन्यांच्या आत हे काम पूर्ण करून घ्यावे. फार्मर आयडी तयार झाल्यावर शेतकऱ्यांना कोणत्याही योजनेचा लाभ घेताना अडचण येणार नाही.

सातबारा नसलेल्या शेतकऱ्यांच्या अडचणींवर मार्ग आणि अग्रीम मदत

विदर्भातील भूदान आणि सीलिंगच्या जमिनी तसेच मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात जमीन कसत असूनही नावावर सातबारा नसल्याने अनेक शेतकऱ्यांना



फार्मर आयडी मिळण्यात तांत्रिक अडचणी येत आहेत. यावर मार्ग काढून दीड कोटी शेतकऱ्यांना अग्रीम आणि एनडीआरएफची मदत देण्याची व्यवस्था सरकारने केली आहे. ज्या शेतकऱ्यांना अद्याप अग्रीम मदत मिळालेली नाही, त्यांचा शोध घेऊन त्यांना ती मदत दिली जाईल, अशी ग्वाही महसूलमंत्र्यांनी दिली.

दुष्काळग्रस्त तालुक्यांचे पुन्हा सर्वेक्षण

दुष्काळाच्या प्रश्नावर बोलताना बावनकुळे यांनी सांगितले की, प्राथमिक स्तरावर ११ तालुक्यांचे ग्राऊंड सर्वेक्षण करून निर्णय घेतला जाणार आहे. तसेच ३०४ तालुक्यांची यादी प्राप्त झाली असून, या संदर्भात मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली जाईल. "दुष्काळाचा प्रश्न राजकीय होऊ नये, यासाठी आमचा प्रयत्न राहील. मुख्यमंत्र्यांनी मंजुरी दिल्यानंतर पात्र तालुक्यांची यादी जाहीर केली जाईल. राज्यातील शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार खंबीरपणे उभे असून, शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी आम्ही सर्वतोपरी काळजी घेत आहोत," असे ते म्हणाले.

महिला सरपंचांना ब्लॅकमेल करणाऱ्या काही महिलांचा नागपूर पोलिसांनी शोध लावून कारवाई केल्याबद्दल महसूलमंत्र्यांनी पोलिसांचे अभिनंदन केले.

राहूल गांधी यांनी भारताच्या बदनामीचा विडा उचलला

काँग्रेस आणि राहूल गांधी यांच्यावर बावनकुळे यांनी जोरदार टीका केली. राहूल गांधी परदेशात जाऊन भारताची बदनामी करत असल्याचा आरोप करत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'वसुधैव कुटुंबकम' या विचारातून २०४७ चा वेध घेत भारताला जगातील १९२ देशांमध्ये प्रतिष्ठा मिळवून दिली असल्याचे ते म्हणाले. राहूल गांधी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यातील फरक हा संस्कृती, संस्कार आणि विचारांचा फरक आहे. तसेच, काँग्रेसला बाळासाहेब ठाकरेंच्या विचारांशी काहीही देणेघेणे नसून, त्यांचा केवळ फायद्यासाठी वापर केला जात आहे.

प्रदूषित विहिरींना पुनरुज्जीवित करा : शिवानी दाणी-वखरे

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

शहरात उन्हाळ्यातील संभाव्य पाणी टंचाईच्या दृष्टीने उपाययोजना आणि पाण्याचा योग्य वापर व नियोजन करण्यासंदर्भात स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे यांच्या अध्यक्षतेत महत्वाची बैठक बुधवारी (ता.१८) पार पडली.

मनपा मुख्यालयातील स्थायी समिती कार्यालयात पार पडलेल्या बैठकीत जलप्रदाय विशेष समिती सभापती श्रीमती दिव्या धुरडे, मुख्य अग्निशमन अधिकारी राजेंद्र उचके, अधीक्षक अभियंता डॉ. श्वेता बॅनर्जी, कार्यकारी अभियंता श्रीकांत वाईकर, सुनील उईके, अनिल गेडाम, उपअभियंता राजीव गौतम यांच्यासह दहाही झोनचे झोनल अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

बैठकीत सर्वप्रथम स्थायी समिती



सभापती शिवानी दाणी वखरे यांनी शहरातील विविध सार्वजनिक विहिरींची स्वच्छता व संबंधित आवश्यक व्यवस्थांचा आढावा घेतला. तसेच पिण्याच्या पाण्याचे अपव्यय टाळावा तसेच उन्हाळ्यात वाढत्या पाण्याच्या वापर व संभाव्य पाणी टंचाईच्या परिस्थितीत लागणाऱ्या व्यवस्थांसाठी दीर्घकालीन उपाययोजना करण्याचे निर्देश शिवानी दाणी वखरे यांनी दिले.

याशिवाय बैठकीत शहरातील विविध सार्वजनिक विहिरींच्या स्वच्छतेची माहिती देण्यात आली. संभाव्य पाणी टंचाई बघता पिण्याच्या पाण्या व्यतिरिक्त नागरिकांना वापरासाठी लागणाऱ्या इतर पाण्याचे अधिक स्रोत उपलब्ध व्हावे, याहेतूने प्रदूषित विहिरींना शुद्ध करण्यासाठी आवश्यक दीर्घकालीन उपाययोजना करण्यावरही चर्चा करण्यात आली. यावर स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे यांनी शहरातील विहिरींची स्वच्छता करण्यासह प्रदूषित विहिरी पुनरुज्जीवित करणे, सार्वजनिक विहिरीतील पाण्याची गुणवत्ता चाचणी करून गुणवत्तेनुसार नागरिकांना त्या पाण्याचा वापर करण्यासाठी उपलब्ध करण्याच्या सूचना केली.

संभाव्य पाणी टंचाईवर आवश्यक उपाययोजना आणि जागरूकता करण्याचे बैठकीत निर्देश

लघुनळ योजनेच्या माध्यमातून शहरातील १०० विहिरींना जोडत नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याच्या व्यतिरिक्त लागणाऱ्या पाण्याची व्यवस्थेवर चर्चा करण्यात आली. यावेळी शहरातील विविध झोननिहाय असलेली पाणी पुरवठ्याची सद्यस्थिती आणि दीर्घकाळात आवश्यक पाण्याची व्यवस्था यावर झोन निहाय अधिकाऱ्यांकडून आढावा घेण्यात आला. संभाव्य पाणी टंचाईला लक्षात घेता पाण्याचा काटकसरीने वापर व्हावा, तसेच पिण्याच्या पाण्याचा वापर इतर ठिकाणी होऊ नये यासाठी नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी धोरण तयार करण्याच्या सूचना केली.

कार्तिक पौर्णिमा महोत्सवाच्या शोभायात्रेच्या नियोजनासाठी आढावा बैठक

उपविभागीय अधिकारी प्रियेश महाजन यांच्या उपस्थितीत विविध विभागांच्या अधिकाऱ्यांशी चर्चा; स्वच्छता, विद्युत व्यवस्था आणि पोलीस बंदोबस्तावर भर



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

रामटेक येथील ऐतिहासिक कार्तिक पौर्णिमा महोत्सवानिमित्त २३ नोव्हेंबर रोजी श्री. भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर २४ नोव्हेंबर रोजी टिपूर पौर्णिमा व रथयात्रा, तर २५ नोव्हेंबर रोजी पारंपरिक मंडई भरणार आहे. या पार्श्वभूमीवर शोभायात्रा व महोत्सवाचे नियोजन सुरळीत व्हावे, यासाठी उपविभागीय अधिकारी प्रियेश महाजन यांच्या उपस्थितीत विविध शासकीय विभागांच्या अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेण्यात आली. भारतीय जनसेवा मंडळाचे अध्यक्ष चंद्रपाल चौकसे व महासचिव डी. मल्लिकार्जुन रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली बैठकीत विविध महत्त्वपूर्ण सूचना मांडण्यात आल्या. यामध्ये शोभायात्रेच्या मार्गाची स्वच्छता, विद्युत विभागामार्फत आवश्यक कामे पूर्ण करणे, शोभायात्रेच्या समारोपस्थळी असलेल्या नगर परिषद मैदानाची स्वच्छता, रस्त्यांवरील चेंबरची दुरुस्ती, तसेच साप्ताहिक बाजाराचे नियोजन या विषयांवर चर्चा करण्यात आली.

याशिवाय शोभायात्रेदरम्यान चोख पोलीस बंदोबस्त, अग्निशमन दलाची व्यवस्था, रुग्णवाहिका उपलब्ध ठेवणे, शोभायात्रा निर्धारित वेळेत सुरू करून वेळेतच तिचा समारोप करणे, तसेच शोभायात्रेच्या मार्गावर फटाके न फोडण्याबाबतही सूचना देण्यात आल्या. सर्व संबंधित विभागांनी आपापली जबाबदारी वेळेत पूर्ण करून महोत्सवाच्या व्यवस्थेत समन्वय ठेवावा, यावर बैठकीत भर देण्यात आला. यावेळी पोलिस निरीक्षक राजेश थोरात, शोभायात्रा समितीचे अध्यक्ष राजेश किंमतकर, नगर परिषद उपाध्यक्ष आलोक मानकर, रजत गजभिये, सुभाष बघेले, मोनू रघुवंशी, मोहन कोठेकर, नत्थू घरजाळे, शेखर पाटील, अथर्व किंमतकर, शुभम बिस्मोरे, तपेश ठक्कर, सोमेश तिवारी, राजेश नानोटे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

बोरखेडी प्रकल्पाच्या १०० मीटर परिसरात झाडे लावणे, खड्डे खोदणे व बांधकामांवर निर्बंध

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

डिफेन्स रिसर्च अँड डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन प्रकल्प, बोरखेडी येथील सुरक्षेच्या दृष्टीने नागपूरचे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी सार्वजनिक सूचना जारी केली आहे.

या सार्वजनिक सूचनेनुसार, बोरखेडी येथील डीआरडीओ प्रकल्प परिसराच्या बाह्य सीमा भिंतीपासून १०० मीटर अंतराच्या परिसरात झाडे लावणे, घरे बांधणे, खड्डे खोदणे किंवा इतर कोणत्याही प्रकाराचे बांधकाम करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. याबाबातचा सविस्तर तपशील अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये नमूद करण्यात आला आहे.

नागपूरचे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी वर्क्स ऑफ डिफेन्स अॅक्ट, १९०३च्या कलम ३(२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून ही सूचना जारी केली असून संबंधित जमिनीचा नकाशा जिल्हाधिकारी कार्यालयातील विशेष भूसंपादन अधिकारी (सामान्य) यांच्या कार्यालयात पाहणीसाठी उपलब्ध आहे. या सार्वजनिक सूचनेनंतरही संबंधित परिसरात कोणतेही अनधिकृत काम किंवा बांधकाम केल्यास ते बेकायदेशीर ठरवले जाईल. तसेच, असे बांधकाम तातडीने पाडून टाकण्यात येईल आणि संबंधित व्यक्तींविरुद्ध नियमांनुसार कायदेशीर कारवाई केली जाईल, असे प्रशासनाकडून कळवण्यात आले आहे.

मराठी फिल्म फेस्टिवल २१ व २२ नोव्हेंबरला

सहा चित्रपटांचे वनामती सभागृहात होणार प्रदर्शन, निर्माते-दिग्दर्शकांशी साधता येणार थेट संवाद

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

ऑरेंज सिटी कल्चरल फाउंडेशनच्या वतीने येत्या २१ व २२ नोव्हेंबर रोजी व्हीआयपी रोडवरील वनामती सभागृहात दोन दिवसीय मराठी फिल्म फेस्टिवलचे आयोजन करण्यात आले आहे. एनएफडीसी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर महानगरपालिका, सप्तक आणि सिने मोंटाज यांच्या सहकार्याने आयोजित या महोत्सवात सहा दर्जेदार मराठी चित्रपट प्रदर्शित करण्यात येणार आहेत.

विशेष म्हणजे, प्रत्येक चित्रपटाच्या प्रदर्शनानंतर संबंधित निमार्ते व दिग्दर्शकांशी थेट संवाद साधण्याची संधी चित्रपटप्रेमींना मिळणार आहे.



महोत्सवात प्रवेश विनामूल्य राहणार आहे.

शनिवार, २१ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता प्राप्तिकर आयुक्त संदीपकुमार साळुंके यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. यावेळी नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विपीन इटनकर, महापौर नीता ठाकरे, महानगरपालिका स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी वखरे आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

सहा दर्जेदार चित्रपटांची मेजवानी

महोत्सवाच्या पहिल्या दिवशी दुपारी १२.१० वाजता गाजलेल्या जयंती-२ या चित्रपटाने चित्रपट प्रदर्शनाला सुरुवात होईल. त्यानंतर मदार आणि खालिद के शिवाजी हे चित्रपट प्रदर्शित करण्यात येणार आहेत. रविवारी, २२ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजल्यापासून साबर बोंडं, सिनेमॅन आणि कुर्ला टू वेंगुर्ला हे चित्रपट दाखविण्यात येतील.

या चित्रपटांमधून सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक तसेच वास्तव जीवनातील विविध प्रश्न आणि पैलू मांडण्यात आले आहेत. विविध चित्रपट महोत्सवांमध्ये पुरस्कार प्राप्त केलेल्या या चित्रपटांना प्रेक्षकांची व्यापक पसंतीही मिळाली आहे.

निर्माते व दिग्दर्शकांशी होणार संवादसत्र

या महोत्सवाचे आणखी एक आकर्षण म्हणजे चित्रपटांच्या निमार्ते व दिग्दर्शकांशी होणारे संवादसत्र. शैलेश नरवडे, मंगेश बदर, राज मोरे, रोहन कानवडे, विजय कळमकर, उमेश बागडे, विनोद कांबळे आणि संदीप गवाडे यांच्याशी चित्रपटप्रेमींना थेट संवाद साधता येणार आहे. चित्रपटांची निर्मिती प्रक्रिया, आशय, दिग्दर्शन आणि त्यामागील अनुभव जाणून घेण्याची संधी यामुळे उपलब्ध होणार आहे.

ऑरेंज सिटी कल्चरल फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात येणारा हा दुसरा मराठी फिल्म फेस्टिवल आहे. यापूर्वी फाउंडेशनने सहा ऑरेंज सिटी आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांचे यशस्वी आयोजन केले आहे.

महोत्सवाचा लाभ सर्वसामान्य नागरिक, महाविद्यालयीन विद्यार्थी आणि चित्रपटप्रेमींनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन ऑरेंज सिटी कल्चरल फाउंडेशनचे अध्यक्ष पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम आणि सप्तकचे विलास मानेकर यांनी केले आहे. पत्रकार परिषदेला रवी डोंगरे, नितीन सहस्त्रबुद्ध, विकास लिमये, श्रीकांत देशपांडे, उदय पाटणकर, डॉ. उदय गुप्ते, अनिल गडेकर यांची उपस्थिती होती.

थोडक्यात

सालेकसा तालुक्यातील सरसकट सर्व शेतकऱ्यांना ५,००० रुपये दुष्काळी मदत द्या, सरपंच संघटनेची आमदारांकडे मागणी



दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा

संपूर्ण गोंदिया जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित झाला असताना सालेकसा तालुक्यातील अनेक शेतकरी ५,००० रुपयांच्या दुष्काळी मदतीपासून वंचित राहिले असल्याने, सरसकट सर्व पात्र शेतकऱ्यांना मदत देण्यात यावी, अशी ठाम मागणी सालेकसा तालुका सरपंच संघटनेने आमदार संजय पुराम यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. खरीप हंगाम २०२६ मध्ये अपुरा पाऊस व रोगांचा प्रादुर्भाव झाल्यामुळे सालेकसा तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शासनाकडून जाहीर करण्यात आलेली ५,००० रुपयांची दुष्काळी मदत काही शेतकऱ्यांना मिळाली असून, अनेक शेतकरी यादीत नाव नसल्यामुळे वंचित राहिले आहेत. त्यामुळे गावागावांत नाराजी व असंतोष निर्माण झाला आहे.

दुष्काळ संपूर्ण तालुक्यात असताना मदत देताना भेदभाव का केला जात आहे, असा सवाल संघटनेने उपस्थित केला आहे. पावसाची कमतरता आणि रोगांचा प्रादुर्भाव सर्वत्र असताना काही शेतकऱ्यांना मदतीपासून वंचित ठेवणे अन्यायकारक असल्याचे निवेदनात म्हटले आहे. तालुका दुष्काळग्रस्त घोषित झाला असल्याने कोणताही भेदभाव न करता सरसकट सर्व पात्र शेतकऱ्यांना दुष्काळी मदत मिळाली पाहिजे, ही संघटनेची ठाम भूमिका आहे. त्याचबरोबर खरीप हंगामातील नुकसानीतून शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळावा व त्यांना पुन्हा उभे राहता यावे, यासाठी उन्हाळी धान (रब्बी) पिकाच्या सिंचनासाठी बाघ प्रकल्पातून आवश्यक पाणी उपलब्ध करून देण्यात यावे, अशीही मागणी करण्यात आली आहे. वरील दोन्ही मागण्यांच्या अनुषंगाने शासन व प्रशासन स्तरावर तातडीने पाठपुरावा करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी विनंती सालेकसा तालुका सरपंच संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी, गोंदिया व तहसीलदार, सालेकसा यांना देण्यात आली आहे.

ॲड. दिनेश खेमसिंग दामहे यांची भाजप नागपूर ग्रामीण (काटोल) जिल्हा प्रसिद्धी आणि माध्यम प्रमुखपदी नियुक्ती




दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

अखिल भारतीय लोधी महासभेचे महाराष्ट्र राज्य युवा अध्यक्ष ॲड. दिनेश खेमसिंग दामहे यांची भारतीय जनता पार्टी (भाजप) नागपूर ग्रामीण (काटोल) जिल्हा प्रसिद्धी आणि माध्यम प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी त्यांना नियुक्तीपत्र सादर करून नव्या जबाबदारीची धुरा सोपवली. याप्रसंगी भाजप नागपूर ग्रामीण (काटोल) जिल्हाध्यक्ष मनोहर कुंभारे, जिल्हा महासचिव आदर्श पाटले, ॲड. संदीप नागपुरे यांच्यासह इतर अधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

नियुक्तीप्रसंगी उपस्थित अधिकाऱ्यांनी ॲड. दिनेश खेमसिंग दामहे यांचे नव्या जबाबदारीबद्दल अभिनंदन केले आणि त्यांना यशस्वी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी ॲड.दामहे यांनी पक्ष संघटनेने त्यांच्यावर सोपवलेली जबाबदारी पूर्ण निष्ठेने आणि निष्ठेने पार पाडण्याची आणि प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून संघटनेचे उपक्रम व विचार जनतेपर्यंत पोहोचवण्याची आपली वचनबद्धता व्यक्त केली.

डोंबिवलीत लोकसेवा समितीचा कोकण महोत्सव



दै. सिंहवाणी वृत्त, डोंबिवली-गुरुनाथ तिरपणकर

गेली जवळजवळ ३ दशके सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या लोकसेवा समिती डोंबिवलीचा भव्य कोकण महोत्सव शुक्रवार २० नोव्हेंबर ते रविवार २९ नोव्हेंबर यादरम्यान सायंकाळी ५ ते १० या वेळात आयोजित केला आहे. अरुणोदय सोसायटी, चिनार मैदान, महात्मा फुले रोड, डोंबिवली पश्चिम येथे संपन्न होणाऱ्या या कोकण महोत्सवात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचा आस्वाद रसिकांना घेता येणार आहे. कोकणातील सुप्रसिद्ध समई नृत्य, रायगड जिल्ह्यातील शक्तीतुरा, मालवण तालुक्यातील दिंडी, ट्रिकसीनयुक्त पारंपरिक दशावतार, सुप्रसिद्ध संगीतकारांची भजने, डबलबाऱ्या, देवादिकांची पालखी, मिरवणूक अशा विविध पारंपरिक कार्यक्रमांचा आनंद रसिकांना लुटता येणार आहे. कोकणातील उत्पादनांची बाजारपेठ, आणि बालदोस्तांसाठी बालनगरी हे या कोकण महोत्सवाचे खास आकर्षण आहे.

गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव तसेच ज्येष्ठ सभासदांचा सत्कार यावेळी करण्यात येणार आहे. डोंबिवलीकर आमदार तथा भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण हे या कार्यक्रमाचे उदघाटन करणार आहेत. सर्वांसाठी प्रवेश विनामूल्य असून डोंबिवलीकरांनी दहा दिवस चालणाऱ्या या सांस्कृतिक कार्यक्रमाचा यथेच्छ आनंद घ्यावा, असे आवाहन लोकसेवा समितीचे अध्यक्ष रामचंद्र (बाळा)परब, आणि सचिव चारुदत्त राणे यांनी केले आहे.

उखर्डा येथील रस्त्यासाठी ग्रामस्थांचा एल्गार; २६ नोव्हेंबरपासून आमरण उपोषणाचा इशारा!

सामाजिक कार्यकर्ते अभिजित कुडे उपोषणाला बसणार

दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा - धर्मेंद्र शेरकुरे

वरोरा तालुक्यातील मौजा उखर्डा (पोस्ट वाघनख) येथील मुख्य रस्त्याची अत्यंत दयनीय आणि धोकादायक अवस्था झाली असून, प्रशासनाच्या पोकळ आश्वासनांना व उदासिनतेला कंटाळून अखेर ग्रामस्थांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. रस्त्याच्या डांबरीकरणाच्या मागणीसाठी आगामी २६ नोव्हेंबर २०२६ पासून आमरण उपोषण सुरू करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. यासंदर्भातील पूर्वसूचना व परवानगीचा अर्ज जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि पोलीस निरिक्षकांसह संबंधित विभागांना निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

प्रशासन आणि लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष

या रस्त्यावरून प्रवास करताना ग्रामस्थ, शाळकरी विद्यार्थी, रुग्ण तसेच शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर नाहक त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे येथे लहान-मोठे अपघात नित्याचे झाले आहेत. या रस्त्याच्या डांबरीकरणासाठी वापूवाहीर्ी ग्रामस्थांच्या वतीने संबंधित बांधकाम विभाग, प्रशासन आणि लोकप्रतिनिधींकडे वारंवार लेखी निवेदने देऊन व आंदोलने करून पाठपुरावा करण्यात आला होता.

मात्र, प्रशासन आणि लोकप्रतिनिधींकडून या गंभीर समस्येकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असून अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्यामुळे अभिजीत प्रभाकररावं कुडे सामाजिक कार्यकर्ते (मु. उखर्डा, पो. वाघनख, ता. वरोरा, जि. चंद्रपूर हे उखर्डा येथील हनुमान मंदिर परिसर, मौजे उखर्डा, पो. वाघनख, ता. वरोरा, जि. चंद्रपूर. येथे दिनांकः गुरुवार, २६ नोव्हेंबर २०२६. दुपारी १२:०० वाजेपासून आमरण उपोषणाला बसणार असल्याचे म्हटले आहे.

अभीजीत कुडे यांचा प्रशासनाला थेट इशारा

प्रशासनाच्या या हलगर्जीपणामुळे व उदासीन धोरणामुळे हतबल होऊन, रस्त्याच्या डांबरीकरणाची मागणी लोकशाही मार्गाने मान्य होईपर्यंत हे शांततामय आमरण उपोषण सुरू राहणार आहे.

आंदोलनादरम्यान कोणतीही वाहतूक कोंडी होणार नाही तसेच कायदा व सुव्यवस्था बाधित होणार नाही, याची पूर्ण दक्षता घेतली जाईल. मात्र, प्रशासनाने या निवेदनाची गंभीर दखल घेऊन तातडीने रस्त्याच्या कामास मंजुरी न दिल्यास तीव्र संताप व्यक्त केला जाईल, असा सज्जड दमही या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

समान काम, समान वेतनासाठी रामटेकचे ३५ न्यायालयीन कर्मचारी बेमुदत संपावर

दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक : समान काम, समान वेतन या प्रमुख मागणीसह विविध प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्रातील जिल्हा व अधीनस्थ न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संप पुकारला आहे. जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या



या राज्यव्यापी आंदोलनात रामटेक न्यायालयातील ३५ कर्मचारी सहभागी झाले असून, न्यायालयीन कामकाजावर परिणाम झाला आहे. गेल्या दोन वर्षांपासून कर्मचारी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करीत आहेत. मुंबई उच्च न्यायालयामार्फत शासनाकडे प्रस्ताव सादर करूनही त्यावर ठोस निर्णय झालेला नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी असून, न्याय हक्कांसाठी संपाचे हत्यार उपसण्यात आले आहे. रामटेक न्यायालयातील आंदोलनात अधीक्षक नरेंद्र उमरेडकर, सहाय्यक अधीक्षक एस. पी. रत्नपारखी, एस. एस. माने, वरिष्ठ लिपिक पी. बी. भागवत, एस. एस. कांबळे, एस. सी. गिरडकर, लघुलेखक आर. के. खिरवाडे, डी. बी. भिवगडे, पी. सी. नंदनवार, कनिष्ठ लिपिक एम. डी. धनजोडे, पी. आर. गुरुमुखी, ए. महाधोळे, मुसिफ अख्तर, आर. आर. राऊत, ए. पी. गजभिये, बेलीफ ए. एम. वानखेडे, शोएब अझहर, बंबल, एम. जठरे तसेच शिपाई ए. शर्मा, डी. केलखोडे, कार्तिक भिमटे आणि एस. कटरे सहभागी झाले आहेत.

उखर्डा येथील ५० वंचित शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वीची ५,००० रुपयांची अग्रीम मदत द्या, तहसीलदार व कृषी अधिकाऱ्यांना निवेदन



दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा-धर्मेंद्र शेरकुरे

यावर्षीचा कोरडा दुष्काळ सरकारने जाहीर केला कापुस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वीची शासनाकडून शेतकऱ्यांसाठी जाहीर करण्यात आलेली ५,०००/- ची अग्रीम विशेष आर्थिक मदत उखर्डा गावातील पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात यावी यासाठी वरोरा तहसीलदार योगेश कौटकर यांना निवेदन देण्यात आले. आधीच शेतकरी नापिकीमुळे नैराश्याच्या छायेत जिवन जगत आहे,त्यातच अधिकाऱ्यांच्या आतमुडी धोरणामुळे शासनाच्या दिवाळीपूर्वीची पाच हजार रुपयांची आर्थिक मदतीपासून वंचित आहे पैसे अद्यापही जमा न झाल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. यासंदर्भात आज अभिजित प्र कुडे यांच्या नेतृत्वाखाली उखर्डा (ता. वरोरा, जि. चंद्रपूर) येथील शेतकऱ्यांनी वरोरा येथील तहसीलदार साहेब आणि तालुका कृषी अधिकारी यांना सविस्तर निवेदन सादर केले. शासनाने दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांसाठी ५,००० रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली होती. परिसरातील बऱ्याच शेतकऱ्यांना ही मदत मिळाली असली, तरी उखर्डा गावातील सुमारे ५० पात्र शेतकरी अद्यापही या मदतीपासून वंचित आहेत.

या सर्व वंचित शेतकऱ्यांनी नियमानुसार आधार कार्ड, फार्मर आयडी, बँक पासबुक आणि सातबारा उतारा यांसारखी सर्व आवश्यक कागदपत्रे संबंधित यंत्रणेकडे वेळेवर सादर केली आहेत. सर्व पूर्तता करूनही तांत्रिक अथवा प्रशासकीय कारणास्तव ५० शेतकऱ्यांना अजूनही या योजनेचा लाभ मिळालेला नाही. दिवाळीचा सण होऊनही हक्काची मदत न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले असून त्यांच्यामध्ये तीव्र नाराजी आहे. यावेळी विनोद ईश्वर कोठारे, हनुमंत शालिक कुडे,पंकज सुरेश डोमकावळे,अनंता अजाब हिवरकर,राजेंद्र मनोहर कुडे, कमलाकर कुडे यांची उपस्थिती होती.

खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रात प्रदूषण नियंत्रणासाठी ॲक्शन प्लॅन

पर्यावरण समितीच्या बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय

दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा

स्थानिक औष्णिक विद्युत केंद्राच्या परिसरातील प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी व हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी विद्युत केंद्र प्रशासनाने ठोस पावले उचलली आहेत १६ नोव्हेंबर सोमवारला वीज केंद्राच्या सौदामिनी कार्यालयात खापरखेडा पर्यावरण समितीच्या सदस्यांची बैठक खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचे उपमुख्य अभियंता नितीन रोकडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीनंतर समितीचे सदस्य व सामाजिक कार्यकर्ते आणि वीज केंद्राच्या अधिकाऱ्यांनी संयुक्तपणे विविध ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी करून प्रदूषण नियंत्रणासाठी अल्पकालीन, मध्यमकालीन व दीर्घकालीन उपाययोजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

समितीचे सदस्य व अधिकाऱ्यांनी वीज केंद्रातील विविध संवेदनशील ठिकाणांची पाहणी करून कोळसा व राखेच्या धुळीमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांचा आढावा घेतला. यावेळी बैठकीत प्रदूषणाची तीव्रता कमी करण्यासाठी उपाययोजना निश्चित करण्यात आल्या. अल्पकालीन उपाययोजनांमध्ये कोळसा वाहक पट्टयावरून खाली पडताना उडणारी धूळ रोखण्यासाठी कोळशावर पाण्याची फवारणी करणे शिवाय चिमणीद्वारे होणारे उत्सर्जन नियंत्रित करण्यासाठी अमोनिया डोसिंगचे प्रमाण वाढविणे यांचा समावेश आहे.

मध्यमकालीन उपाययोजनां अंतर्गत कोळशाच्या धुळीचा प्रसार रोखण्यासाठी क्रशर हाऊसभोवती ग्रीन मॅट बसविण्यात येणार असून, ५०० मेगावॅट संच परिसरात धुळीचे उत्सर्जन नियंत्रित करण्यासाठी रेन गन बसविण्यात येणार आहेत.

दीर्घकालीन उपाययोजनांमध्ये अनेक मोठ्या प्रकल्पांचा समावेश करण्यात आला आहे. क्रशर हाऊस व बंकर परिसरातील धूळ नियंत्रणासाठी डिडस्टिंग प्रणाली उभारण्याचा सविस्तर प्रकल्प अहवालास आंदोलने करून पाठपुरावा करण्यात आला होता.

मात्र, प्रशासन आणि लोकप्रतिनिधींकडून या गंभीर समस्येकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असून अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्यामुळे अभिजीत प्रभाकररावं कुडे सामाजिक कार्यकर्ते (मु. उखर्डा, पो. वाघनख, ता. वरोरा, जि. चंद्रपूर हे उखर्डा येथील हनुमान मंदिर परिसर, मौजे उखर्डा, पो. वाघनख, ता. वरोरा, जि. चंद्रपूर. येथे दिनांकः गुरुवार, २६ नोव्हेंबर २०२६. दुपारी १२:०० वाजेपासून आमरण उपोषणाला बसणार असल्याचे म्हटले आहे.



मुंबई मुख्यालयातील मंडळाची मान्यता प्राप्त झाली असून या प्रकल्पाचे काम लवकरच सुरू होणार आहे. तसेच राख वाहून नेणाऱ्या बल्कर व ट्रकच्या स्वच्छतेसाठी स्वयंचलित जल फवारणी प्रणाली उभारण्याचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. यासोबतच कोळसा हाताळणी विभाग आणि राख हाताळणी विभागातील फ्लाय ॲशच्या धुळीचे उत्सर्जन रोखण्यासाठी वॉटर कॅनन फॉगर प्रणाली खरेदी करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. नैसर्गिकरीत्या धुळीचा प्रसार रोखण्यासाठी विद्युत केंद्राच्या परिसरात बांबू लागवड वाढविण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे.

यासर्व उपाययोजनांच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन व प्रदूषण नियंत्रणासाठी खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र पूर्णपणे कटिबद्ध असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

बैठकीला उपमुख्य अभियंता सचिन डेगवेकर, किशोर सूर्यवंशी, अधीक्षक अभियंता शिरीष वितोंडे, गीतांजली पारखी, प्रभारी अधीक्षक अभियंता प्रशांत भट, कार्यकारी अभियंता सोनाली वानखडे, अजय पुंड, सुरक्षितता अधिकारी नितिन मोहोड, कामगार कल्याण अधिकारी आनंद वाघमारे, सतीश शेंडे, पर्यावरण समितीचे सदस्य दिवाकर घेर, अमर जैन, सुनील जालंदर, विनय महाजन, डॉ. ओंकार केळवदे, श्रीराम सातपुते सामाजिक कार्यकर्ते अभय मिश्रा कपिल वानखडे व अन्य अधिकारी प्रामुख्याने उपस्थिती होते.

कार्तिक पौर्णिमेनिमित्त बुद्धवनात २४ नोव्हेंबरला भव्य धम्ममेळावा

सुनील केदार यांच्या हस्ते उद्घाटन, आमदार आशिष देशमुख यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण

दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा

कार्तिक पौर्णिमेचे औचित्य साधून तथागत गौतम बुद्ध यांच्या विचारांचा प्रसार, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीला उजाळा आणि धम्मविचारांचे प्रबोधन करण्याच्या उद्देशाने विश्व मैत्रेय बुद्धिस्ट संघ, नागपूरच्या वतीने बुद्धवन रामगिरी, ता. कळमेश्वर येथे मंगळवार, २४ नोव्हेंबर रोजी भव्य धम्ममेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या धम्ममेळाव्याचे विशेष आकर्षण म्हणजे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण असून, दिवसभर विविध धार्मिक, सामाजिक आणि प्रबोधनात्मक कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे.



धम्ममेळाव्याचे उद्घाटन माजी मंत्री सुनीलबाबू केदार यांच्या हस्ते होणार आहे. तर आमदार आशिष देशमुख यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात येणार आहे. विधान परिषद सदस्य राजीव पोद्दार हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहतील. यावेळी राज्याचे महसूलमंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, खासदार श्यामकुमार बर्वे यांच्यासह राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि धार्मिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ११ वाजता होईल. यावेळी भंते धम्मसार आणि भंते मिलिंद यांची धम्मदेसना आयोजित करण्यात आली आहे. तथागत बुद्धांचा मानवतावादी विचार, समता, स्वातंत्र्य, बंधुता, करुणा आणि मैत्रीचा संदेश या धम्मदेसनेतून उपस्थितांना दिला जाणार आहे. त्यानंतर दुपारी १२ ते ४ या वेळेत प्रसिद्ध प्रबोधनकार विकास राजा यांचा बुद्ध-भीम गीतांवर आधारित संगीतमय प्रबोधनाचा कार्यक्रम होणार आहे. गीत आणि संगीताच्या माध्यमातून बुद्धविचार, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य, सामाजिक न्यायाची संकल्पना तसेच परिवर्तनवादी चळवळीचा इतिहास उपस्थितांसमोर मांडण्यात येणार आहे. नागरिकांनी, धम्मबांधवांनी आणि आंबेडकरी अनुयायांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन संस्थेचे सचिव धनराज बहादुरे यांनी केले आहे.

न्यायालयीन कर्मचारी बेमुदत संपाचा दुसरा दिवस

दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

महाराष्ट्र राज्यातील दुय्यम न्यायालयांमध्ये कार्यरत असलेल्या न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे राज्य सरकार सातत्याने दुर्लक्ष करत असल्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी आहे. वारंवार विनंत्या, चर्चा आणि निवेदने देऊनही मागण्या पूर्ण होत नसल्याने, अखेरीस महाराष्ट्र राज्य न्यायिक कर्मचारी १७ नोव्हेंबर २०२६ पासून बेमुदत संपावर गेलेले आहे. आज संपाचा दुसरा दिवस असुन सावनेर सह संपूर्ण महाराष्ट्रातील न्यायालयीन कर्मचारी आपल्या



मागण्यांवर ठाम असुन उत्साहात आंदोलनात सहभागी होत आहेत. महाराष्ट्र शासनाने याबाबत कोणताही ठोस निर्णय घेतलेला नाही. केवळ वेतनश्रेणीच नव्हे, तर इतर मागण्याही अद्याप प्रलंबित आहेत. सरकार प्रश्नांना गांभीर्याने घेत नसल्याने न्यायालयीन कर्मचाऱ्यांमध्ये निराशा आणि तीव्र असंतोष वाढत न्यायालयीन कामकाज पुर्णपणे बंद पडले असुन न्यायालय परिसरात वादि-प्रतिवादींचा शुकशुकाट दिसुन येत आहे.

सावनेर मध्ये न्यायालयीन कामकाज मोठ्या प्रमाणात प्रभावीत झाले त्यामुळे वकिलांमध्ये आधी पक्षकारांमध्ये मोठ्या प्रमाणात आक्रोश दिसून आला. सावनेर वकील संघाचे अध्यक्ष यांनी शासनाला निवेदन केले आहे की, या प्रकरणात लवकरात लवकर तोडगा काढण्यात यावा. कारण अगोदरच संथ न्यायप्रक्रियेमुळे लोकांना उशिरा न्याय मिळतो त्यातच अशा प्रकारे वेळ वाया गेल्याने पक्षकारांन मध्ये आक्रोश निर्माण होऊन परिस्थिती आणखी बिघडू शकते.यावर राज्य शासनाने जातीने लक्ष देत न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या रास्त मागण्या मान्य करण त्यांच्याशी न्याय करावा असे मत सावनेर तालुका बार असोसिएशनचे अध्यक्ष शैलेश जैन यांनी आमच्या स्थानिक प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केले.



याप्रसंगी सावनेर वरिष्ठ स्तर व कनिष्ठ स्तर फौजदारी व दिवाणी न्यायालयाचे सौ वानखेडे, अधीक्षक, भगत सहाय्यक अधीक्षक, पिपरेवार सहाय्यक अधीक्षक,नागपुरे लघुलेखक, चिलबुले लघुलेखक कडू मॅडम लघुलेखक, काळे वरिष्ठ लिपिक, रोकडे वरिष्ठ लिपिक, सोलंकी वरिष्ठ लिपिक राऊत मॅडम वरिष्ठ लिपिक, जुमडे प्रमुख बेलीफ, एस एस मुकादम कनिष्ठ लिपिक, पी एम सोनकुसळे कनिष्ठ लिपिक, सुरकार कनिष्ठ लिपिक, दैने बेलीफ, देशमुख, गजानन खराटे बेलीफ, हाडगेवार बेलीफ, बडोकर बेलीफ, खोरगडे बेलीफ कु. नवगडे कनिष्ठ लिपिक कु. भुजाडे कनिष्ठ लिपिक,थेटे शिपाई, जाधव शिपाई, नकाशे सफाईगार आदिंनी बेमुदत संपात सहभाग घेत घोषणाबाजी केल्या.